# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९०**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सहावे / अंक ३ / फेब्रुवारी २००५

## संपादकीय

### 'पाणी, पाणी....' (।)

या जगात तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्यावरून होईल असे मत समाजशास्त्रज्ञ व पर्यावरणाचे अभ्यासक सातत्याने मांडताना दिसत आहेत. पाणी या प्रश्नाचे हे गांभीर्य जाणूनच आमच्या कलावाणिज्य महाविद्यालयाच्या भूगोल विभागाने राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त सहकार्याने 'पाणी व्यवस्थापन विषयाचा भविष्यवेध २००५' या विषयावर एक दिवसाची राष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेच्या बीज भाषणात खासदार सुरेश प्रभू यांनी जे उपलब्ध आहे त्याचेच व्यवस्थापन करावे लागणार आहे कारण पाणी निर्माण करणे शक्य नाही हा विचार प्राधान्याने मांडला. या संदर्भातलोकसंख्येच्या प्रमाणात पाण्याचे व्यवस्थापन यावरही ते अतिशय अभ्यासपूर्ण बोलले.

या भाषणातील महत्त्वपूर्ण मुद्दे लक्षात घेऊन त्या संदर्भात आपले वागणे तपासून पाहिले तर हा विषय किती धगधगता आहे हे जाणवेल. एकीकडे वरील भाकित आपण ऐकतो, वाचतो व वागताना जैसे थेच वागतो. याच परिषदेच्या काही दिवस आधीपासून महानगरपालिकेची जलसाक्षरतेसाठी वितरित झालेली पोस्टर्स पाहण्यात आली. ही पोस्टर्स लोकशिक्षणासाठी आवश्यक आहेत व चांगलीही आहेत. पण हे सर्व होत असताना पाणी प्रश्न तसाच गंभीर आहे, गांभीर्य सातत्याने वाढणारा आहे.

'चोवीस तास पाणी' असल्याचे अमिष दाखवून जागा विकणारे धूर्त बिल्डर्स, एका विभागात चोवीस तास धो धो वाहणारे पाणी तर दुसरीकडे त्याच गावात आज पाणी येणार की नाही या चिंतेत असणारे नागरिक या विषम वाटपाला जबाबदार कोण? .... व्यवस्थापनासाठी गृहसंकुलनिहाय कार्यक्रमाची आखणी विभागीय आयुक्तांनी करायला हवी. सकाळी ४ व सायंकाळी २ तास पाणी हे सर्वसाधारणत: पुरेसे असते. या दृष्टीने नागरिकांची मानसिकता बदलणार कशी? काल साठवलेले पाणी बाथरूममध्ये 'शिळे पाणी' म्हणून ओतून दिले जाते हे आम्ही अनेक घरात अनुभवले आहे. हे साठवणीतले पाणी ओतून द्यावयाचे नाही तर त्याचा वापर करावा अशा कोणत्या शक्य जागा आहेत. (वॉशिंग मशीन, गाडी धुणे, कुंडीतील झाडांना घालणे इ.) हे आम्ही कधी जाणून घेणार आहोत? वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर हा आपल्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न आहे हे आम्ही समजावून घेतले नाही तर २०२५ या टप्प्यापर्यंत आम्ही राहू का हा प्रश्न निर्माण होईल. कारण त्यापूर्वीच तिसरे महायुद्ध झालेले असण्याची शक्यता आहे!




वर्ष सहावे / अंक ३ / फेब्रुवारी २००५

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक ८ वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शतकत्रय कर्ता भर्तृहरी | शं. बा. मठ | ३ |
| २) | डॉ. मो. दि. पराडकर यांचे आत्मकथन | डॉ. मो. दि. पराडकर | ८ |
| ३) | श्रीमत् भगवत् गीता (यथार्थ सत्य सुदर्शन) | आशा भिडे | ११ |
| ४) | सांस्कृतिक युद्धे व ऋग्वेदीय अग्नि | यशवंत साने | १८ |
| ५) | आनंदाचे डोही | रश्मी कुलकर्णी | २६ |
| ६) | माझा शैक्षणिक प्रवास व ग्रंथालये | डॉ. उमेश तेंडुलकर | २९ |
| ७) | साहित्य जगत | शरद जोशी | ३२ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# शतकत्रय कर्ता भर्तृहरी

*भर्तृहरीच्या नावावर असणाऱ्या साहित्याचा कर्ता भर्तृहरी कोण? या साहित्याचा काळ कसा ठरवायचा, या अशा प्रश्नांच्या संदर्भातील हा लेख. - संपादक*

(लेखांक पहिला)

प्राचीन संस्कृत वाङ्मयात ज्या काही साहित्यकृती आपल्या वैशिष्ट्यानी सर्व भारतात लोकप्रिय झाल्या, मान्यता पावल्या त्यात भर्तृहरीच्या शतकत्रयाचा व विशेषत: 'नीति' शतकाचा उल्लेख आवर्जून करावा लागतो.

काव्य ग्रंथात संख्येने मर्यादित पण वाङ्मयदृष्ट्या संपन्न अशी लघुकाव्येही सहजच लक्ष वेधून घेतात. ही काव्ये बोधप्रद व सूक्ती संग्रहात्मक असून शतकानुशतके रसिकांच्या जिव्हेवर नाचत होती. लघुत्व, आटोपशीरपणा, वेधकता, मूल्य, विवेक आदी कारणांनी ही काव्ये लोकप्रिय झाली. या प्रकारच्या काव्यात नीति शतकाची गणना सर्व प्रथम करावी लागेल. नीतिशतक हे धर्मसापेक्ष नसून मूल्याधिष्ठित आहे. त्याचे सार्वजनीकत्व व सर्वकालीनत्व हेही एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. या शतकत्रयाचा कर्ता भर्तृहरी हा मान्यवर रचनाकार म्हणून प्रसिद्ध पावला आहे.

## भारतीय दृष्टिकोन

प्राचीन भारतात स्वत:विषयी काही सांगण्याने आत्मश्लाघा होईल असे वाटत असल्याने बहुतेक प्राचीन लेखकांची चरित्रे अथवा त्यांचे कालनिर्णय हे समजावून घेणे वा ठरविणे अतिकठीण झाले आहे. आपल्या देशात अतिप्राचीन काळापासून साहित्य हे अनेक शाखांनी समृद्ध असूनही त्याजविषयक ऐतिहासिक माहिती मात्र उपलब्ध नाही. पुराणे इत्यादीतून राजे लोकांची माहिती आढळते परंतु तीत इतिहासाऐवजी अतिशयोक्तीच विशेषत्वाने असल्याने त्या माहितीच्या ऐतिहासिक दृष्ट्या विशेष उपयोग होत नाही. यामुळे संस्कृत साहित्य विपुल असूनही ते श्रेष्ठ व अजरामर ठरूनही त्यांच्या रचनाकाराविषयी दुर्दैवाने काहीच माहिती नाही असे म्हणावेसे वाटते. भर्तृहरी देखील याला अपवाद नाही. परंपरेने चालत आलेली माहिती एवढाच काय तो आधार. अनेक आख्यायिका वा दंतकथा कित्येक शतके प्रसारित झाल्या असल्या तरी ऐतिहासिकदृष्ट्या त्या निरुपयोगी ठरतात. भर्तृहरीविषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्यावरून भर्तृहरीविषयीची माहिती मिळते.

## अर्वाचीन कोश

भर्तृहरी हा शककर्ता विक्रमादित्य राजाचा वडिलभाऊ होता. तो उज्जयिनीस राज्य करीत होता. विक्रमादित्य, सुभटतीर्थ, हे त्याचे धाकटे बंधू व मैनावती त्याची बहीण अशी तीन भावंडे होती. आईचे नाव सुशीला. ही राजकन्या भर्तृहरीची पत्नी होती. भर्तृहरी हा राजा, कवी व योगी होता. त्याने काही कारणाने राजत्याग केला. आपल्या धाकट्या भावाला - विक्रमादित्याला राज्य दिले. शतकत्रय वा वाक्यपदीय-व्याकरणग्रंथ ही त्याची वाङ्मय निर्मिती मानली जाते.

## नाथ लीलामृत

यावरून भर्तृहरीची आई सुशीला ही तिच्या वडिलांची एकुलती एक राजकन्या होती. वृद्धपणी जंबू नगरच्या राजाने आपला ज्येष्ठ नातू भर्तृहरी याला आपले राज्य दिले. भर्तृहरीने त्या राज्याची गादी उज्जयिनीला आणली. विक्रमादित्याला युवराज पद दिले. सुभटवीर्याला

सेनापती नेमिले.

भर्तृहरीने एकदा एका ब्राह्मणाकडून मिळालेले अपूर्व फळ आपल्या पत्नीला दिले. तिने ते आपल्या याराला दिले, त्याने ते एका वेश्येला दिले, वेश्येने ते फळ त्या ब्राह्मणाला दिले. राजाला हे सारे वृत्त कळताच स्त्रीच्या अनैतिक व चंचल स्वभावाची त्याला उबग आली व वैराग्य प्राप्त होऊन विक्रमादित्याला राज्य देऊन तो अरण्यात गेला.

इकडे त्याची पत्नी पद्माक्षी सर्पदंशाने मृत झाली. चर्पटीनाथाने आपल्या योग बळाने तिला जिवंत केली व पिंगळा असे नाव ठेविले. पुढे काही दिवसांनी पिंगळा मृत्यू पावल्यावर गोरक्षनाथांनी योग सामर्थ्याने शंभर पिंगळा निर्माण केल्या. राजाची (भर्तृहरी) योगबळावरची श्रद्धा दृढ झाली. त्यानंतर भर्तृहरी हा एक श्रेष्ठ योगी झाला. उज्जयिनी जवळ भर्तृहरी नावाची एक गुहा होती. तिला 'भर्तृहरी गुंफा' असे म्हणतात.

शेषगिरी शास्त्री

चंद्रगुप्त नावाच्या ब्राह्मणाला चार वर्णाच्या चार बायका होत्या. ब्राह्मणि, भानुमती, भाग्यवती व सिंधुमती अशी त्यांची नावे होती. त्यांच्यापासून अनुक्रमे वररुचि, विक्रमादित्य, भट्टी व भर्तृहरी असे चार पुत्र त्याला झाले. विक्रमादित्य राजा झाल्यावर भट्टी हा त्याचा प्रधानमंत्री झाला.

आणखी अनेक दंतकथा आहेत

या साऱ्या दंतकथा ऐतिहासिक निकषावर टिकणाऱ्या नाहीत. शतकत्रय कर्ता भर्तृहरी याजविषयी माहिती देण्याला या साऱ्या असमर्थ ठरतात. एक वेळ तो विक्रमादित्याचा वडील बंधू होता यावर विश्वास ठेविता येईल. त्याच्या वैराग्याला कारणीभूत झालेली घटना ही उघडउघड एका लोकप्रिय सुभाषितावर आधारलेली उत्तरकालीन दंतकथा असावी व ते सुभाषितही भर्तृहरीचे नसावे. एक गोष्ट मात्र नजरेत भरते की शतकत्रयाच्या बहुतेक हस्तलिखितात या कवीचा उल्लेख, राजर्षी, भूपति, महामुनींद्र, महाकविचक्रचूडामणि, महायोगीश्वर आदी उपपदे लावून केला आहे. यावरून भर्तृहरी राजश्रेष्ठ, कविश्रेष्ठ, योगिश्रेष्ठ म्हणून ओळखला जात असावा. यामुळे उत्तरकाळात अनेक दंतकथांचा विस्तार निर्माण झाला असावा.

भर्तृहरी नावाचे अनेक लेखक होते काय असा संभ्रम त्यामुळे निर्माण होतो. १) शतकत्रयाचा कर्ता भर्तृहरी २) भट्टी काव्याचा कर्ता भट्टी वा भर्तृहरी ३) वाक्य पर्याय कर्ता भर्तृहरी ४) नाथ संप्रदायात उल्लेखलेला योगी भर्तृहरी.

हे सर्व भर्तृहरी एकच का भिन्न? एकच ठरविले तर कालनिर्णय करणे कठीण होऊन बसते. नाथपंथी योगी ९ व्या व १० व्या शतकातील असावेत असे डॉ. पेंडसे यांनी म्हटले आहे. भर्तृहरीचा काळ इतका अर्वाचीन कोणी मानीत नाही.

भट्टीने आपल्या काव्यात स्वत: असे म्हटले आहे की श्रीधर सेन राजा असताना वलभी येथे आपण हे काव्य रचिले. हे काव्य रामायणावर आधारित आहे. या काव्याला 'रावणवध' असेही नाव आहे. हे काव्य चतुष्काण्डात्मक आहे व त्याचे बावीस सर्ग आहेत. कवीचे लक्ष व्याकरणावर विशेष आहे. त्यांनी अपवाद, गुण दोष, अलंकार इत्यादिकांची उदाहरणे आपल्या काव्यात समाविष्ट केली आहेत. यामुळे हे दोघे एक नव्हते.

भर्तृहरीने 'वाक्य पदीय' व्याकरण ग्रंथ लिहिले असावे असे अनेक संशोधकांचे मत आहे. मात्र वाक्यपदीय कर्ता व शतकत्रय कर्ता हे दोघे भिन्न असावेत असेही वाटते. कारण वैयाकरण भर्तृहरी हा सातव्या शतकातील असावा असा विचार व्यक्त होत असल्याने शतकत्रय भृर्तहरी हा भिन्न मानावा लागतो.

## शतकत्रय भर्तृहरी

शृंगार, नीती व वैराग्य या तीन शतकांचा रचयिता भर्तृहरी हा वेद, स्मृती, पुराणे यांचा साक्षेपी अभ्यासक होता, हे त्याच्या काव्यातून ध्यानात येते. तसेच उपनिषदाचा गाढ अभ्यास असावा असे दिसून येते. तीनही शतकात विष्णु व शिवाचे महात्म्य वर्णिले आहे. तो शिवोपासक असावा असा तर्क करता येतो. पुराणविषयक अवतार, सर्ग, प्रलय, युग इत्यादी कल्पनांना त्यांनी काव्यात स्थान दिलेले आहे. अलंकार, छंद व व्याकरण त्याला अवगत होती. परोपकार, सदाचरण, धैर्य, सौजन्य इत्यादी चिरंतन मानवी मूल्यांचा त्याने सतत पाठपुरावा केला आहे. प्रणय भावनेचा सर्वकष प्रभाव ठाऊक असूनही त्याने जीवनात भोगापेक्षा त्यागाला अधिक महत्त्व दिलेले आहे. वैराग्याची शिकवण भारतीय परंपरेला धरून अशीच आहे. दैववाद प्रभावी असला तरी प्रयत्नाची उपयुक्तता त्याने प्रतिपादलेली आहे. जीवनात नैतिक मूल्याचे अधिष्ठान किती मूलगामी आहे याची त्याने शतकत्रयीतून शिकवण दिलेली आहे. ही शिकवण सर्व धर्मियांना, पंथाना, शाखांना समान व त्रिकालाबाधित आहे. त्यामुळे त्याची शतकत्रयी लोकप्रिय झालेली आहे.

जीवनात विलास, उपभोग, नीती, सदाचार, संग परित्याग व वैराग्य यांचा त्याने अनुभव घेतल्याने त्याला या तीनही अवस्थांचा प्रत्यक्ष व दाट परिचय झाला असावा. याच दृष्टीने तो कवी, राजा आणि योगी असा संबोधिला जातो. त्याच्या रचनेतून अभिव्यक्त होणारे हे व्यक्तिमत्त्व त्याच्या सार्वजनिक व सार्वकालीन लोकमान्यतेस पोषक असेच आहे.

ब्रह्मनिष्ठ जीवनाचा अनुभव घेत असतानाही भर्तृहरीची दृष्टी व्यवहारावरून ढळली नाही. जीवनातल्या लहान लहान प्रसंगावर आणि क्षणचित्रांवर भाष्य करताना त्याची खोल, मार्मिक, व्यवहार कुशल दृष्टी दिसून येते. नीति शतकातले बहुतेक सारे विषय सामान्य माणसाच्या जीवनाला स्पर्श करणारे व जिव्हाळ्याचेच आहेत. त्याची एक दृष्टी चिरंतन सत्याकडे आणि दुसरी लोक व्यवहाराकडे होती. त्याचा तोल गेला नव्हता. जगाला तो विसरला नव्हता; किंबहुना जगातले सारे व्यवहार शुद्ध नीतीच्या दृष्टीने अर्थपूर्ण व यशस्वी करणे ही त्याच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट होती. भर्तृहरी हा सामन्यांचा असामान्य असा भाष्यकार होता.

### भावकवी -

संस्कृत वाङ्मयातील भर्तृहरी हा एक अप्रतिम भावकवी आहे व त्याचे श्लोक ही उत्कृष्ट स्फुट भावगीते आहेत. भावकवीला लागणारे बहुतेक सारे गुण त्याच्या अंगी आहेत. प्रतिभेचा अस्सलपणा, सहजता, दृष्टांताची रेलचेल, मार्मिक शब्द योजना, अनुभवाची समृद्धी, विशाल जीवन दर्शन यामुळे त्याचे काव्य आल्हाददायक आणि लोकप्रिय झाले आहे. भारतीय मनाला चिंतनशीलतेची व तात्विक दृष्टीकोनाची आवड स्वभावत:च आहे. भर्तृहरी हा अशा मनाचा प्रतिनिधी आहे. परंतु त्याच्या काव्याचा विषय केवळ वैराग्य केवळ तत्वज्ञान नसून तर संबंध एकसंध जीवन हा आहे.

### कालनिर्णय -

त्याच्या कलाकृतीवरून याचे अनुमान करता येत नाही. विक्रमादित्याचा तो मोठा भाऊ असे मानल्यास त्या काळाचा विचार करावा लागतो. विक्रमाने खिस्तपूर्व ५७ व्या वर्षी संवत् सुरु केला. हा शककर्ता मानला गेला आहे. म्हणून भर्तृहरी खिस्त पूर्व १ ल्या शतकात होऊन गेला असे मानावे लागते. त्याच्या कलाकृतीवरून असे दिसते.

१) शतकत्रयात वेदान्त विषयक उल्लेख आढळतो. मात्र वेदान्त विचार हा श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या

पूर्वीपासूनचा आहे. आचार्यांनी त्याची तर्कशुद्ध मांडणी केली.

२) पुराण कथांचे निर्देश - ही पुराणेदेखील फार प्राचीन काळापासून प्रचलित आहेत.

३) दशावतारात बुद्धाचा समावेश - ही मान्यता खिस्तपूर्वकाळीच त्याला प्राप्त झाली आहे.

४) काही बौद्ध कल्पनांची छाप शतकत्रयात आढळते. शतकांची शिकवण सर्वांना उपयुक्त असल्याने सर्व भारतीयाना ती समान अशीच आहेत.

त्याची सुभाषिते अनेक ग्रंथांतून उद्धृत केलेली आढळतात. उदा. काव्य प्रकाश पंचतंत्र, महानाटक यावरून भर्तृहरी हा यांच्यापूर्वी होऊन गेला ही काल निर्णयाच्या दृष्टीने उत्तर मर्यादा ठरावी. पंचतंत्र, पंचाख्यायिका इत्यादी ग्रंथ ६ व्या शतकात प्रसिद्ध होते व त्यात भर्तृहरीचे श्लोक आहेत. यावरून तो पाचव्या शतकापूर्वी होऊन गेला असावा असे वाटते.

कालिदासाच्या शाकुंतलात - **भवन्तिनम्राः तखः फलागमैः । ..** सतांविभूतयः हा श्लोक आहे. सुभाषित म्हणून तो श्लोक भर्तृहरीने घेतला असावा. कालिदास हा खिस्तपूर्व १ल्या शतकात झाला असून भर्तृहरी १ल्या शतकातला असावा असा तर्क करावा लागतो. येणेप्रमाणे कालनिर्णय करावा लागतो.

**भर्तृहरी हा संकलक होता काय?**

भर्तृहरी हा रचनाकार कवी होता अशी भारतीय परंपरा आहे. काही तुरळक सूक्ते त्याने इतरापासून घेतली असतीलही. परंतु स्वतः तो कवी असून ध्येयवादी दृष्टिकोनातून ही शतके त्याने निर्माण केली आहेत. भर्तृहरी हाच शतकत्रयाचा रचयिता कवि होता. हे मानणे योग्य ठरेल.

शतकत्रयात योजनाबद्धता आहे. त्याचा एकात्म आशय ध्यानी येतो. त्यावरून तो निर्माता कवीच असला पाहिजे. शतकत्रयावरून हा शिवउपासक असल्याचे दिसून येते. त्यानी तीन शतके लिहिली. जीवनातील या तीन अवस्थात मानवी आचरणामागे कोणत्या निष्ठा असाव्यात हे दिग्दर्शित करण्यासाठी, तीनही शतकातील विचारधारा, आशय, अभिव्यक्ती या जवळजवळ एकाच स्रोतातून निघालेल्या आढळतात.

भर्तृहरीच्या शृंगार, नीति व वैराग्य या तीन शतकांनी स्फुटकाव्य या वाङ्मय प्रकाराचे दालन अधिकच समृद्ध केले असून, त्याची प्रतिष्ठाही वाढविलेली आहे. कलात्मक मांडणी बरोबरच कवीचे शहाणपण, प्रज्ञा, याचेही प्रतिबिंब त्यात पडलेले आढळते. त्यामुळे वाचकाला आनंद तर होतोच आणि काहीतरी निधान सापडल्यासारखे वाटते. हे वाङ्मय संत्रस्त मनाला दिलासा देते, त्याच्या मनातील निराशेची वादळे पळवून लावते आणि त्याला नव संजीवनी देते, उत्तेजित करते. त्याच्या वाङ्मयाबद्दल थोडेसे

**शैली**

स्फुट श्लोकाची रचना फार मोठ्या प्रमाणात संस्कृत वाङ्मयात आढळून येते. या रचनेला सुभाषिताचे स्वरूप आले आहे. तत्त्वज्ञान आणि दैनंदिन व्यवहार यांचा मेळ अशा प्रकारच्या काव्यात सहजतया घडतो. एखादे तत्त्व अनेक मार्मिक समर्पक दृष्टान्ताच्या द्वारा काव्यमय रीतीने व्यक्त किंवा सूचित केलेले असते. बहुधा ते शेवटच्या ओळीत येते. कवीच्या मनाचे जगातल्या व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण येथे प्रतिबिंबित झालेले असते. प्रत्येक श्लोक एक स्वतंत्र काव्य असते.

**लघुकाव्ये**

लघुकाव्ये सूक्तिसंग्रह विभागात मोडतात. प्राचीन

भारतीय काव्यातील लघुकाव्यांची उत्क्रान्ती अभ्यासनीय आहे. लघु काव्ये ही ललित रम्य असून त्यानाही लक्षणीय परंपरा आहे. वैदिक वाङ्मयातील उषः सूक्ते, वरुण सूक्ते यात पुढील काळातील निसर्गपर व भक्तिपर बीजे आढळतात. रामायणातील निसर्ग चित्रणे महाभारतातील स्तुतिपर स्तोत्रे (गीते) यातून लघु काव्याची कल्पना निघाली असावी. छंद शास्त्रातील वृत्त वैविध्यावरूनही लघु काव्याची प्राचीनता अजमाविता येईल. पाली भाषेतील थेर गाथा, गाथा सत्तई ही लघुकाव्याची उत्कृष्ट उदाहरणे होत. या काव्य प्रकारात तीन भिन्न प्रवाह आढळतात - १) निसर्ग व प्रणय यावर शृंगार प्रधान रचना २) भक्ती, धर्म यावर स्तोत्रपर रचना ३) नैतिक बोध पर रचना.

या गोष्टी लघुकाव्यात रुढ झालेली काव्ये - कालिदासप्रणित ऋतुसंहार मेघदूत, अमरुक कवीचे अमरुशतक, इत्यादी. पुढील काळात गोवर्धनाचे आर्या-सप्तशती, मयूरकवीचे सूर्यशतक, जयदेव कवीचे गीतगोविंद, बिलहणाचे-चौरपञ्चाशिका इत्यादी. कवींनी लघुकाव्याच्या ललित निर्मितीला हातभार लाविला. भर्तृहरी हा सर्व प्रथमचा सूक्ति संग्रहकार असून त्याची तीन शतके म्हणजे लघुकाव्यातील तीन नेटके प्रवाहच होत.

उत्तरकालीन कवींनी सारा भर स्तोत्रावर व सूक्ति संग्रहावर दिला. निसर्गाकडे दुर्लक्ष झाले. मात्र शृंगार प्रधान निर्मिती मधून मधून होताना आढळते. लघुकाव्याचा अंतिम आविष्कार गंगालहरी, भामिनी विलास दोनही पं. जगन्नाथकृत चंडिदास - बाणकृत, भक्तामर स्तोत्र, कृष्णलीलामृत-लीलाशुककृतही भक्तिपर लघुकाव्याची काही ठळक उदाहरणे होत.

## सुभाषित संग्रह

संस्कृत साहित्य समृद्ध झाले. ललित, मार्मिक, मनोवेधक सूक्ताची निवड करण्यात आली. रसिकात याची आवड निर्माण झाली. आज उपलब्ध असलेले सुभाषित संग्रह १० व्या शतकातील असावेत. प्राकृतातही असे संग्रह आढळतात. 'कवीन्द्र वचन समुच्चय' हा सर्वात आधीचा संग्रह मानला जातो. वल्लभदेवाचा- 'सुभाषितावळी' ३५२७ सुभाषिते असून १०१ वर्गात विभागणी केलेली आहे. (काळ इ.स. ११६० पूर्वी) श्रीधरदासाचा - 'सदुक्ति कर्णामृत' (रचना १२०६) वैगदेशीच संग्रह जलहण संपादित इ.स. १२५७ तील 'सूक्तिसूक्तावळी' संग्रह श्लोक २७९० व विभागणी १३३ वर्गात. शार्ङ्गधर- 'शार्ङ्गधर पद्धती' श्लोक ४६८९ रचना १६९३ हा संग्रह बराच लोकप्रिय झाला.

श्रीधर - सुभाषितावली, रूपगोस्वामी-पद्यावली, सूर्यकलिंगराय - सूक्ति-रत्नहार इत्यादी संग्रह सांप्रत उपलब्ध आहेत.

वाङ्मयीन कृतीस फार बहर आल्यानंतरच असे संग्रह तयार होतात. उत्कृष्ट वाङ्मय काळ प्रवाहात नष्ट झाल्यावरही त्यातील सूक्ते शिल्लक राहतात. या संकलनामार्फत देशकाल परिस्थिती याची बरीच कल्पना येऊ शकते. भाषेचा विकासही ध्यानात यावयास मदत होते.

(क्रमशः)

- शं.बा.मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

प्रतिक्रियांसाठी
दूरध्वनी
☎ २५४२ ६२७०

# डॉ. मी. दि. पराडकर यांचे आत्मकथन

### भाग ९

मागे सांगितल्याप्रमाणे रूईया महाविद्यालयात माझ्यावर झालेल्या अन्यायामुळे सन् १९५८ पासूनच मी व्यथित होतो आणि मुंबईत हे महाविद्यालय संचालित करणाऱ्या संस्थेच्या आजीव सदस्यांचा निषेध व्यक्त करण्यासाठी महाविद्यालयाच्या कुठल्याही अधिकृत समारंभात उपस्थित न रहाण्याची मोकळीक मला माझे गुरू व संस्कृत विभागाध्यक्ष प्रा. रं. रा. देशपांडे यांनी आनंदाने दिली. संस्कृत विभागाच्या सर्व उपक्रमांशी माझा घनिष्ठ संबंध होता परंतु तत्त्वत: हे सर्व महाविद्यालयाचे संचालन करणाऱ्या आजीव सदस्यांचेच ना! त्यामुळे या प्रसंगी माझी अनुपस्थिती सर्वांनाच, विशेषत: विद्यार्थ्यांना खटकणारीच होती परंतु गुरुवर्य देशपांडे यांनी प्रत्येक समारंभाला साजेसे स्पष्टीकरण दिल्यामुळे तसा गाजावाजा होऊ शकला नाही हे गुरुवर्यांच्या हार्दिक सहानुभूतीचेच सामर्थ्य.



परंतु याच काळात ठाण्यात घडलेल्या एका महत्त्वाच्या घटनेमुळे मी नाट्य-दिग्दर्शकही झालो याचा उल्लेख अपरिहार्य ठरेल. ठाण्यातला तात्कालिन समाज भारतीय संस्कृतीचा आणि पर्यायाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याबद्दल अभिजात आस्था असणारा. यात संस्कृतच्या प्रेमामुळेच माझ्या परिवाराचे मित्र श्री. शं. बा. मठ यांचा उल्लेख प्रामुख्याने केला पाहिजे. ते माझ्या जवळच रहात होते व त्यांनी आपल्या सहयोगी मित्रांपुढे गिरगावातील ब्राह्मण संस्थेच्या संस्कृत नाटकांच्या यशस्वी प्रयोगापासून प्रेरणा घेऊन ठाण्यात एखादे संस्कृत नाटक बसवण्यासाठी कल्पना मांडली आणि ती संमत करून घेतली. मी रुईया महाविद्यालयात संस्कृत नाटकेच शिकवीत होतो आणि माझ्या 'अतिरिक्त' तासांना होणाऱ्या गर्दीत ठाण्यातल्या विद्यार्थ्यांचाही अंतर्भाव होता. त्यामुळे मित्रवर्य मठांनी माझ्याकडे येऊन नाटक बसवण्याच्या कल्पनेला गती देण्यासंबंधी चर्चा करावी यात नवल नाही. 'मृच्छकटिक' हे मूळ संस्कृत नाटक मराठी अनुवादामुळे आणि त्यातल्या वसन्तसेना, शकार, राजाचा मित्र विदूषक यांच्या मराठी रंगभूमीवरील नटांच्या अप्रतिम भूमिकांमुळे गाजलेले; साहजिकच याची चर्चा झाली आणि नाटकाच्या प्रयोगाची सर्व जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपविलीही; परंतु 'वसन्तसेना' या नायिकेच्या भूमिकेसाठी माझ्या दृष्टीने अनुकूल व्यक्ती मिळवणे शक्य झाले नाही यामुळे तो बेत बारगळला तथापि संबंधितांची आस्था लक्षात घेऊन मी 'वेणीसंहार' हे भट्ट नारायणाचे नाटक बसविण्याचा सल्ला दिला. या नाटकाचा प्रयोग ब्राह्मणसभेनेही मोठ्या थाटात सादर केला होता तो मी अर्थातच पाहिला होता आणि ते वीररसप्रधान नाटक मी शिकवीतही होतो. कौरवांच्या सभेत द्रौपदीवर आलेल्या केशाकर्षणाच्या प्रसंगामुळे प्रक्षुब्ध झालेला भीम 'हा अन्याय करणाऱ्या दु:शासनाच्या रक्तानेच मी प्रिय द्रौपदीची वेणी बांधेन' ही भीषण प्रतिज्ञा करतो आणि ती महाभारतातल्या कंदनात खरी करून दाखवतो ही या नाटकाची मूळ कथा साधारणपणे सर्वांना माहीत असलेली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अन्याय-प्रतिकारक भूमिकेला ही शोभणारी होती. माझे मित्र श्री. मठ यांचा विषय संस्कृत असल्यामुळे त्यांनी ही नाटक मुळातून वाचलेले. साहजिकच हे नाटक ठाण्यात रंगभूमीवर आणायचे हे ठरले.

परंतु नाटकातली युधिष्ठर, दुर्योधन, कर्ण, अश्वत्थामा, भीम अशी बरीच पात्रे जनमानसात घर करून राहिलेली; यांच्याबद्दलच्या माझ्या नाटकाच्या आकलनाला अनुरूप अशी निवडण्याची जबाबदारी श्री. मठ आणि त्यांचे सहकारी यांनी पूर्णपणे माझ्यावर सोपविली; संस्कृत नाटकात भूमिका करण्याच्या उत्साहामुळे आणि माझ्याबद्दलच्या विश्वासामुळे आम्ही सर्व इच्छुकांची सभा बोलविली; नाटकात भूमिका लहान किंवा मोठी याला महत्त्व नसते, ती तुम्ही कशी बजावता यावरच नाटकाचे यश अवलंबून असते हे सर्वांनी मान्य केले आणि सर्वाधिकार माझ्या स्वाधीन केले. संस्कृत नाटकात मराठीप्रमाणे भूमिका करणाऱ्यांना पडद्याआडून सांगणे (Prompting) अशक्य असल्यामुळे आपले शब्द, वाक्य त्यातील चढ-उतारांसह पाठ असणे अत्यावश्यक असते हे माझे म्हणणे सर्वांनाच पटल्यामुळे पाठांतर दृष्ट लागण्यासारखे झाले हे आम्ही केलेल्या रंगीत तालमीवरून सिद्ध झाले. माझ्या या सर्व परिश्रम घेण्यात कसूर न करणाऱ्या सहकाऱ्यांनी मला जे यश दिले त्यासी 'तुळणा नसे'. या सर्वांना नाटकाची, रंगभूमीची माहिती होती हे माझे सुदैव, यामुळे त्या बाबतीत मला काही शिकवावे लागले नाही तथापि बहुसंख्य पात्रांना संस्कृत मुळातून येत नसल्यामुळे मला सुरुवातीचे तीन-चार महिने सर्वांसमोर संस्कृत नाटक वाचून दाखवावे लागले हे खरे परंतु तो माझ्या सवयीचाच भाग होता. रंगीत तालमीच्या दिवशी सुप्रसिद्ध संस्कृत (आणि मराठी) नट श्री. दाजी भाटवडेकर यांना ब्राह्मण सभेतील काही सहकाऱ्यांसह सूचना व सल्ला देण्यासाठी बोलावले होते त्यांनी अनुकूल अभिप्राय दिला, माझ्या पात्रांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त केले आणि संस्कृत उच्चारणाच्या शुद्धतेबद्दल गौरवाचे उद्गार काढले. ब्राह्मण सभेने 'वेणीसंहारम्' सादर करताना नाटकाच्या तिसऱ्या अंकातील रुधिरप्रिय आणि वसागन्धा यांच्या संवादाला त्यांनी नाट्यरूप दिले नव्हते. व्यक्तिश: मला तो कथानुकूल म्हणजे वीररसाला पोषक आणि म्हणूनच नाटकात रंगत आणणारा वाटत होता म्हणून तो मी माझ्या संकल्पित नाटकात रंगभूमीवर आणण्याचे ठरवले त्याला अर्थातच संमती माझ्या सर्व सहकारी मित्रांनी दिली. प्रश्न राक्षसीचे म्हणजे वसागन्देचे काम करणारी मुलगी मिळण्याचा म्हणजे बिकटच होता. परंतु माझा योगच चांगला होता; माझा विद्यार्थी चि. नन्दू कुळकर्णी स्वत:च म्हणाला, 'सर तुमच्यासाठी मी ती भूमिका करतो' हे माझ्या अध्यापकीय जीवनातील प्रामाणिकपणाचे; यशस्वीतेचे पारितोषिक होते. मग आम्ही त्या संवादात येणारे, मारल्या गेलेल्या कौरव वीरांच्या रक्ताचे म्हणजे लाल रंगाने दिसणारे घडे रंगभूमीवर आणून दाखवले आणि राक्षस रुधिरप्रिय (भूमिका श्री. महादेव लागू) आणि वसागंधा हा प्रवेश फारच यशस्वी ठरला. योगायोगाने त्या वर्षी सरकारतर्फे स्पर्धेसाठी संस्कृत नाटकातले प्रवेश दाखवण्याची संधी माझे संस्कृत व अर्धमागधीचे गुरु प्रा.के.आर.पोतदार (आता दुर्दैवाने दिवंगत) यांच्या प्रेमामुळे मिळाली आणि आम्ही हा प्रवेश आणि त्याच्या पुढचा कर्ण व अश्वत्थामा यांचा कलह या स्पर्धेत सादर केला. बीभत्स हा भयानकाला जन्म देणारा रस रंगभूमीवर रसोत्कर्ष करू शकतो हे या प्रयोगाने सिद्ध झाले. नाट्यगृहात आलेली लहान मुले या राक्षस-राक्षसींचा प्रवेश पाहून बेहोश झाली म्हणजे आमच्या प्रयोगावर यशाची मोहोर उमटली ! कर्ण आणि अश्वत्थामा यांचा खरा झगडा द्रोणाचार्यांच्या वधाचा सूड उगवण्याच्या प्रत्येकाच्या सामर्थ्याच्या वल्गनेतून निर्माण होतो आणि याचवेळेला 'सोऽयं (दु:शासन:) मद्भुजपञ्जरे निपतित: । संरक्ष्यतां कौरवा: । असे भीमाचे रणभूमीवरील आव्हान या दोघांच्या कानावर येते. अश्वत्थाम्याने कर्णावरच्या रागाने शस्त्र टाकून दिले होते म्हणून त्याने कर्णाला सांगितले 'रक्षसांप्रतं भीमाद्दु:शासनम्' असे कर्णाला म्हणावे हे स्वाभाविकच. ही भीमाची आरोळी रणभूमीवरून येते आहे हे दाखविण्यासाठी आम्ही त्यावेळी

अगदी मागच्या पडद्यावर मधोमध भीम दु:शासनाला बुकलत असल्याचे दाखवले आणि पहिल्या पडद्यावर वरील शब्द बोलणारे अश्वत्थामा आणि कर्ण दाखवले. हे मला त्यावेळी सुचले हा संस्कृत नाटके शिकवीत असल्यामुळे संस्कृत रंग देवतेच्या अनुग्रहाचाच भाग ! प्रयोग बघत असताना प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजविल्या. स्पर्धेतला प्रयोगाचा अग्रक्रम दोन्ही प्रवेशामुळे ठरून गेला आणि परीक्षक समितीचे अध्यक्ष श्री. चिन्मुळगुंद यांनी आनंदाने तसे जाहीर केले आणि ठाण्यात त्या वर्षीच स्थापन झालेल्या संस्कत संवर्धक मंडळाने महाराष्ट्र राज्याच्या स्पर्धेतल्या पहिल्या संस्कृत नाट्य प्रयोगात पहिला क्रमांक मिळवला ! सुरुवातीला सांगितल्यामुळे मी यशस्वी नाट्यदिग्दर्शक ठरलो ! मी दिग्दर्शित केलेले आयुष्यातले पहिले आणि शेवटचे संपूर्ण सहा अंकी संस्कृत नाटक. वस्तुत: हे माझे यश नसून माझ्या सहकाऱ्यांचे त्यांच्या रंगभूमीच्या जाणीवेचे आणि शुद्ध संस्कृत पाठ करणाच्या त्यांच्या अद्भुत स्मरणशक्तीचं यश आहे. या नाटकाचा चौथा अंक प्रधान्याने कर्णवधाच्या दारूण घटनेपूर्वीच्या कौरवांच्या दृष्टीने दु:खदायक प्रसंगांचे वर्णन करणारा. हे सर्व या अंकातील सुन्दरक हा कर्णाचा सारथी प्रभावी संस्कृत गद्यातच करतो; हे नाटकाच्या दृष्टीने आवश्यक असले तरी ते पाठ करून नाटकाच्या प्रयोगात सादर करणे म्हणजे अवघड जबाबदारी होती, ती ही भूमिका करणाऱ्या महादेव लागू यांनी ज्या सफाईने पार पाडली त्याचे मुक्त कंठाने कौतुक माझ्यासारख्या संस्कृतचा प्राध्यापकही करील यात शंका नाही. खरं म्हणजे या नाटकात सर्वांनी आपल्या भूमिका चोखपणाने बजावल्या. कर्ण आणि अश्वत्थामा यांचा कलह माझे मित्र श्री. शंकर मठ आणि श्री. बाळ बापट यांनी समरसतेने रंगवला. वस्तुतः नाटकातल्या प्रत्येक पात्राची प्रशंसा करायला हवी. या सर्वांनी नाटकात केलेल्या भूमिका माझ्या या आत्मकथनात मुद्दाम नमूद करतो. १) भीम - मामा जोशी २) युधिष्ठिर - बाळ दामले ३) अर्जुन व कृपाचार्य - नाना दातार ४) धृतराष्ट्र - जोशी मास्तर ५) अश्वत्थामा - बाळ बापट ६) कर्ण - शंकर मठ ७) संजय - वामन प्रभुदेसाई ८) राक्षस रुधिरप्रिय - महादेव लागू ९) सुन्दरक - श्रीपाद पटवारी. स्त्री भूमिकात १) गांधारी - ताराबाई सहस्त्रबुद्धे २) भानुमती (दुर्योधनाची पत्नी) - सौ. कणेकर ३) द्रौपदी - सौ. प्रभुदेसाई, सखी (द्रौपदीची) - विजया रहाळकर, दुसरी सखी - आशा गोगटे. जनसंघाचे प्रमुख कार्यकर्ते व नंतर डोंबिवलीचे नगराध्यक्षपद भूषविणारे आबासाहेब पटवारी यांनीही त्यावेळी सूत ही छोटी भूमिका वठवली होती. या नाटकातल्या शेवटच्या सहाव्या अंकात विजयी ठरलेल्या युधिष्ठिर या पांडवांच्या राजाला आशीर्वाद देण्यासाठी 'भगवान् उपदेष्टा हरि:' येतो त्याच्या तोंडी काही वाक्ये आणि एक श्लोक आहे. रंगभूमीवर ते सादर करण्याची जबाबदारी सर्वांच्या आग्रहाखातर मला स्वीकारावी लागली म्हणजे योगायोगाने मी 'सुदर्शनधारी श्रीकृष्ण' ही झालो. अशा रीतीने वेणीसंहारम् या एका संपूर्ण सहा अंकी संस्कृत नाटकाची कथा 'सुफल संपूर्ण' झाली. हा माझ्या अध्यापकीय जीवनातला अनुभव अविस्मरणीय होता. याच्या यशात माझ्यावर उल्लेख केलेल्या सर्व सहकाऱ्यांबरोबर माझी सहचारिणी सौ. मंगला पराडकर (दुर्दैवाने आता दिवंगत) व भाऊ मधुकर पराडकर यांनी ही उल्लेखनीय कष्ट घेतले. म्हणूनच 'संहति: कार्यसाधिका' ही संस्कृतमधली उक्ती खरी ठरली. संस्कृत संवर्धक मंडळाने आपल्या महाराष्ट्रीय पातळीवरील यशानिमित्त संस्कृतचे काशीतील विख्यात विद्वान पंडित राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्या हस्ते माझा सत्कार केला आणि 'क्लेश: फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' या कालिदासोक्तीची प्रचीती आणून दिली.

- मो.दि. पराडकर

माहीम, मुंबई

# श्रीमत् भगवत् गीता
## यथार्थ सत्य सुदर्शन

*भगवद्गीतेवरील काही महत्त्वपूर्ण ग्रंथांचा परिचय करून देणाऱ्या लेखमालेतील हा पुढील लेख. - संपादक*

| | | |
|---|---|---|
| लेखक | - | भगवंत यशवंत पेंडसे |
| प्रकाशक | - | भ.य.पेंडसे, नागपूर |
| प्रथमावृत्ती | - | शके १९०६ पौष |
| पृष्ठे | - | २१३ |
| किंमत | - | ऐंशी रुपये |

*अभ्यासार्थ अमूल्य*

या पुस्तकाला प्रस्तावना लेखकाचीच आहे. त्यात लेखकाने आपले मनोगतही व्यक्त केले आहे. हा ग्रंथ लिहिण्यामागील लेखकाची भूमिका विस्तृतपणे विषद केली आहे. त्यानंतर 'थोडा खुलासा' आहे. त्यात 'मी' गीतेचे मूळ शब्द कायम ठेवले आहेत त्याचे कारण की त्या शब्दांचा पूर्ण गर्भितार्थ व सामर्थ्य हे भाषांतरित अनेक शब्दांनीही करणे जड जाते. काही ठिकाणी शब्दांचे अर्थ बुद्धिपुर:स्सर दिले आहेत. कारण त्यात अनेक अर्थ सामावले आहेत हे ध्यानी यावे. शब्दकोश मराठीत नसल्याने इंग्रजी अर्थ देण्याशिवाय इलाज नव्हता. गीतेतील सुमारे पाचशे शब्दांचा कोश या सोबत जोडावा असे वाटत होते परंतु तेवढा खर्च झेपेल असे दिसेना. द्वितियावृत्तीच्या वेळी शक्य झाल्यास ग्रंथाबरोबर कोश छापीन. शुद्धीपत्र शेवटी जोडले आहे, असे लेखकाने म्हटले आहे.

प्रस्तावनेत ते म्हणतात, 'लहानपणही गीता म्हणणे हा धार्मिक भाग होता. नंतर त्यातील अवतरणे मराठी ग्रंथात वाचण्यात आली तीवरून गीतेचे आकर्षण वाढले. ज्ञानेश्वरीची पारायणे त्यातील उपमा, अलंकार, भाषेचा गोडवा यामुळे झाली व प्रत्येकवेळी नवा अर्थ प्रत्ययास येऊ लागला. नंतर 'गीतारहस्य' वाचले. संस्कृत ज्ञानामुळे मूळ अर्थाकडे पाहण्याची इच्छा झाली व त्या दृष्टीने विचार करता ग्रंथात कुठेतरी उणेपणा वाटू लागला. पुढे वामन पंडिताची यतार्थदीपिका वाचली. हे सर्व वाचन हायस्कूलमध्ये असताना झाले. नंतर गीतेवर मिळेल तो ग्रंथ वाचला. भाषणे, प्रवचने ऐकली. ज्ञान वाढत होते. अनेक विद्वानांकडून शंका निरसन करणे चालू होते. गीतेचा अर्थ सांगणारे संप्रदाय प्रवर्तक पंडित होते असे असून विरोध कां? हा प्रश्न सतावीत होता व त्याकरिता मूळ गीतेची कास धरणे हा एकच मार्ग दिसू लागला व त्या अनुरोधाने जो अर्थ निघेल तो ग्राह्य असे ठरवल्यानंतर भिन्न लेखकात जो विरोध आहे त्याची कारणे दिसू लागली. काही एक कल्पना उराशी बाळगून तीच कल्पना गीतेत आहे असे अट्टाहासाने दाखवण्याची धडपड, त्यामुळे करावी लागणारी ओढाताण, उपमेची लांबण त्यामुळे विपरित कल्पना मांडल्या जातात. **'लोकेऽस्मिन द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्तामयानद्य'** असे असताना कर्म, ज्ञान व भक्ती या तीन मानल्या जाऊन त्यांना प्रत्येकी सहा सहा अध्यायही वाटून दिले गेले. या तिन्हींच्या जोडीला काहींनी हठयोग बसवून त्या चार केल्या. सांख्यांचा ज्ञानयोग व योग्यांचा कर्मयोग व तोही **'एकं सांख्यं च योगं च य: पश्यति स पश्यति'** आणि **'सांख्ययोगी पृथग्बाला: प्रवदन्ति न पंडिता'** असे असल्याने खरोखरच एकच सूत्र गीतेत आहे असे वाटू लागले व त्या दृष्टीने विचाराला चालना मिळाली.

नाऽनुमतमतच्छद्वात्' या सूत्राप्रमाणे जो शब्द नाही, त्यावरून बांधू नये असे असून गीतेत कोठेही द्वैत अगर अद्वैत हे शब्द नसताना त्यावरच काथ्याकूट सुरू झाला. गीतेत द्वंद्व, निर्द्वंद्व, द्वंद्वातीत हे शब्द आहेत. द्वंद्व व द्वैत एकच असते तर हरकत नव्हती परंतु द्वंद्व = द्वौ द्वौ सहाभिव्यक्तौ व द्वैत = द्विधा इतं दद्वैत' दोन दोन अशा जोडीने बरोबर व्यक्तत्वात येणारे (manifested in pairs) व दोन भागात विभालेले (divided into two or cut into two) असे हे शब्द भिन्नार्थी असल्याने अद्वैत, द्वैत, केवळ अद्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत वगैरे सर्व मूळ गीतेला सोडून असल्याचे प्रत्ययाला येऊ लागले.

गीता व्यासकृत आहे, गीतेचे तीन लेखक आहेत वगैरे तसेच तो गवळ्याचा पोवाडा, छिनाल कृष्णाचा चर्पटपंजर, कृष्णाने अर्जुनाचा रथ नरकात नेला. वगैरे सारखे अवांतर प्रतिपादनही झाले आहे. या मतामतांच्या गलबल्यातून खरी गीता कळणे दुर्घट झाले आहे. गीतेचा जो दृष्टिकोन आहे तो काय आहे? त्यात काही त्रिकालाबाधित सिद्धान्त असतील तर ते कोणते या सर्वांचा शोध घ्यायचा असेल तर गीतेच्याच आधारे त्यातील तत्त्वे पहावयाची म्हणजे त्यातील तत्वांचे यथार्थ दर्शन घडेल ही गोष्ट विचार करता करता निश्चित झाली.

'वासुदेव: सर्वमिती' या ठिकाणी सर्व विश्वाच्या आत्म्यावर सत्ता गाजवणारी शक्ती म्हणजे परब्रह्म या अर्थी हा शब्दप्रयोग आहे. परब्रह्म हे सर्वत्र, सर्वात भरून उरले आहे म्हणून 'वासुदेव: सर्वम्' हे परब्रह्माच्या स्वरुपाशी जुळणारे आहे. व्यक्तीरुपी कृष्णाच्या स्वरूपाशी नव्हे. यामुळे गीता हा भागवत धर्माचा ग्रंथ म्हणता येणार नाही. म्हणून मोठमोठ्या पंडितांनी जरी गीतेचा भागवत धर्माशी संबंध जोडला असला तरी तो बरोबर आहे असे वाटत नाही. गीतेत भक्ती आहे तसेच ज्ञान, कर्म, योग वगैरेही आहेत व त्या सर्व गीताप्रणित योगाला धरून आहेत.



मूळ गीतेचे तत्त्वज्ञान जे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले ते एकसंधी असले पाहिजे. त्यात अध्याय पाडले गेले ते नंतर व्यासांनी किंवा इतर कोणी पाडले असतील व त्यांना नावेही दिली असतील. वेगवेगळ्या भाष्यकारांनी वेगवेगळी नावे अध्यायांना दिलेली दिसून येतात. संपूर्ण गीता ही एकसंध विचार सरणी वेगवेगळ्या दृष्टिकोनातूनच व मुद्यातून पटवून देण्याचा प्रयत्न आहे ही गोष्ट ध्यानात आली तर अजिबात घोटाळा होणार नाही व पहिल्या सहा अध्यायांना 'कर्मपर' दुसऱ्या सहा अध्यायांना 'भक्तिपर', तिसऱ्या सहा अध्यायांना 'ज्ञानपर' वगैरे वगैरे प्रकारांनी तिच्याकडे पाहणे एकदम बंद होईल.

अर्जुनाचे मधून मधून समाधान होणे म्हणजे तेथे गीता संपली असा तर्क काही विद्वानांनी काढला आहे पण तो बरोबर नाही. जेव्हा श्रीकृष्णाला जे सांगावयाचे ते सर्व सांगून झाले व त्याने अर्जुनाला विचारले की पूर्ण समजले का व त्यावर अर्जुनाने होकारार्थी उत्तर दिले तेथे गीता संपली.

वरील सर्व विवेचन प्रस्तावनेत केल्यानंतर लेखक प्रस्तावनेच्या शेवटी म्हणतो की आम्ही गीतेच्या आधाराने गीतार्थ सांगायचे ठरवले आहे ही गोष्ट लक्षात आली असेल.

दुसऱ्यांची मते खोडून काढण्याचा अट्टाहास नाही त्यामुळे अभिनिवेश नाही. गीतेत अमूकच आहे असे गृहीत धरून त्या अनुरोधाने शब्दांची व अर्थाची फिरवाफिरव नाही किंवा कुठलीही एक दृष्टी ठेऊन येथे विवरण नाही. कुठलेही आचार्य, ज्ञानेश्वर, टिळक, वामन पंडित, डॉ. बेझंट, अरविंद घोष, राजवाडे, नीलकंठ, व्यंकटेश्वर वगैरे अनेक भाष्यकार,

टीकाकार यांचा कुठलाही अधिकार मानण्यात येणार नाही. गटे, कांट, शोपेन हॉर, ॲरिस्टॉटल वगैरे सारख्या तत्त्ववेत्त्यांशी तुलना नाही. इतकेच काय पण उपनिषदे, आरण्यके, दर्शनि वगैरेचाही उपयोग न करिता स्वतंत्ररीतीने गीतेचेच तत्त्वज्ञान काय आहे ते पहावयाचे आहे.

कुठल्याही शास्त्री पंडिताशी चर्चा करून शंका निरसनाचा प्रयत्न करूनही पूर्ण समाधान न झाल्याने स्वत:च गीतेच्या आधारे अर्थ लावण्याचे ठरविले. अध्ययनामुळे व चर्चांमुळे विचार पक्के झाले होते. गीता एक अप्रतीम ग्रंथ आहे. ऐहिक व पारलौकिक कल्याणकारी हितकर असे त्रिकालाबाधित सिद्धान्त सांगणारा हा अनमोल हिरा आहे याची खात्री पटली. या ग्रंथ निर्मितीची प्रेरणा ज्याने दिली त्या भगवान श्रीकृष्णाच्या चरणकमलांशिवाय ग्रंथ अर्पण करण्यास अन्य पवित्र व योग्य स्थान कुठे शोधावे?

॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥

लेखकाने प्रस्तावनेत अत्यंत निर्भिडपणे व परखडपणे आपली मते मांडली आहेत. लेखकाचा गीतेचा अभ्यासही प्रदीर्घ काळचा असल्यामुळे चौफेर व सखोल आहे.

प्रत्येक अभ्यासात श्लोकाचा नुसताच अर्थ दिलेला नाही तर अध्याय पहिला श्लोक पहिला यात कुरुने नांगरलेली यज्ञाची जागा कुरुक्षेत्र. या ठिकाणी जे तप करतील किंवा युद्धात मारले जातील त्यांना स्वर्ग मिळेल असा वर कुरुस दिला म्हणून याला धर्मक्षेत्र म्हणतात. धर्म म्हणजे न्याय. अंतिम न्याय हा रणांगणावर मिळतो म्हणून धर्मक्षेत्र असे शब्दाचे मार्मिक विवेचनही केले आहे. तिसऱ्या श्लोकाचे विवेचन करताना ते म्हणतात पांडवांचे सैन्य सात व कौरवांचे सैन्य अकरा अक्षोहिणी म्हणजे पांडवांपेक्षा खूप मोठे होते तरीपण दुर्योधन त्यांच्या सैन्याला मोठे म्हणतो ते त्यामधील वीरशिरोमणींमुळेही असेल किंवा सैन्य लहान म्हणून लढण्यात गाफिलपणा राहू नये याकरिताही असेल यावरून दुर्योधन अतिशय दक्ष व सावधचित्त होता असे दिसते. सैन्याची रचना करणारा बुद्धिमान व तुमचाच शिष्य आहे हे द्रोणाचार्यांना सांगतांनासुद्धा त्याची सावधानताच दिसून येते.

पर्याप्त - परिमित, हृषिकेश - इंद्रियांचा स्वामी, धनंजय-धन जिंकणारा, महारथी - दहा हजार योध्यांबरोबर एकट्याने लढणारा वृकोदर - लांडग्यासारखे पोट असणारा (लांडग्याचे पोट पातळ असणे, अन्न खूप लागते व पचनशक्ती जबर असते. धृष्ट - A Bold, Courgeous द्युम्न - Splendor, glory, strength, power, गुडाकेश - निद्रेचा स्वामी.

केशव - १) केशी राक्षसाला मारणारा २) He who has beautiful hair on his head ३) K-Brahma the creator, A - Vishnu, Isa-Rudra. असे गीतेतील कठीण शब्दाचे अर्थ व श्लोकांचा अर्थ देऊन अनेक ठिकाणी त्यावर विवेचनही केले आहे. ही अभ्यासकांच्या दृष्टीने अत्यंत अमूल्य गोष्ट आहे.

'गीता' संवादात्मक असल्याने अर्धा श्लोक संजयाचा व अर्धा अर्जुनाचा असे झाले आहे. गीता पद्यांत आहे तेव्हा ती कुणीतरी रचली असावी. कारण माणूस पद्यात बोलत नाही तर गद्यात बोलतो अशी शंका घेण्यात येते. जर श्लोक बोललेले नसते, रचलेले असते तर अर्धा चरण तोडण्याचे कारण नव्हते. कवीला श्लोक सहज पूर्ण करता आला असता हे लेखकाचे म्हणणे आहे पण वास्तववादी वाटण्यासाठी म्हणूनही कवीने असे श्लोक तोडून दोघांच्या तोंडी घातले असावेत हे ही नाकारता येणार नाही असे वाटते.

अध्यायाच्या शेवटी 'ॐ तत्सदिती श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे । श्रीकृष्णार्जुन संवादे अर्जुन विषाद योगोनाम प्रथमोऽध्याय:॥ अशी समाप्ती केली आहे. योग या शब्दाच्या गीतेत दोन व्याख्या केल्या आहेत 'योग: कर्मसु कौशलम्' आणि समत्वं

योग उच्यते' गीतेत संपूर्ण विवेचन योगाच्या अनुषंगानेच केलेले असल्याने आपण इतके लक्षात घेतले पाहिजे की या योगाचे शास्त्र आहे. शास्त्र म्हणज नियम, उत्पत्ती, योगाबद्दल जे जे सांगायचे आहे ते सर्व. समत्व आणि कर्मातील कौशल्य हे शरीर, मन व बुद्धी यांचा योग्य वापर केला तरच शक्य आहे. हर्षविवाद हे द्वंद्व आहे व द्वंद्वातील अशी निर्द्वंद्व अवस्था योगामुळे प्राप्त होते.

लेखकाने या अध्यायाच्या शेवटी महत्त्वाचे निवेदन केले आहे की प्रत्येक अध्यायाचा जो शेवट आहे त्याचा कृष्ण अगर अर्जुन यांच्याशी संबंध नाही. ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. वेगवेगळ्या टीका, भाष्ये पाहिली तर अध्यायांची नावे भिन्न दिसून येतात. काही ठिकाणी तर एकाच ग्रंथकाराने अध्यायाचे सुरवातीचे नाव व भाष्याच्या सुरवातीचे नाव ही भिन्न दिली आहेत असे दिसून येते. भिन्न नावे देणाऱ्यात श्रीशंकराचार्य, टिळक, मधुसूदन सरस्वती, श्रीधर स्वामी वगैरे भाष्यकार आहेत. अध्यायाचे शेवटी वर्णन येते त्याचा खुलासा करावयाचा म्हणून केला आहे इतकेच. कृष्ण अर्जुन संवाद हा एक सलग विषयासंबंधी आहे. पहिल्या अध्यायाचा शेवटचा श्लोक संजयाचा आहे. दुसऱ्या अध्यायाची सुरवात संजय उवाच अशी आहे व पहिला श्लोक संजयाचा आहे. तिसऱ्या अध्यायाचा शेवटचा श्लोक कृष्णाचा आहे व चौथ्या अध्यायाची सुरवात कृष्णानेच केली आहे म्हणजे त्याचेच बोलणे सुरू आहे तरी पण तेथे पुन्हा पहिल्या श्लोकापूर्वी श्रीभगवानूवाच आले ! असेच काही ठिकाणी आणखीही आहे. या तोडीतोडीने विषयाचे अनुसंधान सुटता कामा नये व अध्यायाच्या नावातील अर्थाकडे पाहून पुढील विवरण वाचू नये. एवढी खबरदारी घेणे आवश्यक आहे असे लेखकाचे सांगणे आहे ते समजून लक्षात घ्यायला हवे.

अध्याय दुसऱ्यातील ३९ व्या श्लोकाचे स्पष्टीकरण करताना सांख्य शब्द संख्या शब्दापासून बनतो. ज्ञान हे संख्येत चालते. एकच एक असले तर ज्ञान नाही. दोन झाले की ज्ञानास सुरवात. तसेच सं + ख्या = सम्यक रीतीने विचार करणे. सांख्य - युद्धासंबंधी (संख्य - युद्ध) विचार सांगितला. आता योगासंबंधी ऐक - युद्ध का केले पाहिजे हे पटवून झाले. परंतु दु:खामुळे मनाची तळमळ होणार ही भीती दूर करण्यासाठी योगाचा म्हणजे समत्व बुद्धीचा उपदेश केला. कर्म हे ज्ञानयुक्त पाहिजे व ज्ञान हे कर्मयुक्त पाहिजे. ते कर्मही युक्त कर्म पाहिजे व ज्ञानही युक्तज्ञान पाहिजे (युक्त - योग्य, अचुक)

श्लोक ४५ - वेद - विद् जाणणे, वेद-ज्ञान, वेद हे विशिष्ट ग्रंथ आहेत. गीतेच्या वेळी त्यांची संख्या तीन असावी असे दिसते. (त्रैगुण्यविषया वेद) सध्या त्यांची संख्या चार आहे. 'अनंत वै वेदा:' वेद अनंत आहेत. म्हणजे ज्ञान अनंत आहे. गुण तीन सत्व-रज-तम ज्ञान नेहमी गुणावर अधिष्ठित असते. यामुळे वेद हे त्रैगुण्यविषय आहेत. असे म्हणण्यात वेदाचा कमीपणा दाखवण्याचा उद्देश नाही हे वस्तुस्थिती निदर्शक आहेत. निंदा नव्हे.

वेदात सर्व प्रकारचे ज्ञान आहे. अधिभौतिक, अधिदैविक, अध्यात्मिक या तीन प्रकाराच सर्व ज्ञान सामावले आहे. वेदांकडे केवळ धार्मिक ग्रंथ या दृष्टीने पाहिले जाते ते बरोबर नाही. मध्यंतरी वेद केवळ पाठ करून म्हणण्यावर भर दिला गेला व त्यातील ज्ञानाकडे दुर्लक्ष झाले. हल्ली संशोधन जसे जसे वाढत आहे तसे तसे ज्ञानाचे भांडार किती अवाढव्य आहे याची कल्पना येऊ शकते. ऋग्वेदामध्ये प्रकाशाचा गतीचा उल्लेख आहे व ती गती हल्लीच्या संशोधनात जी शास्त्रज्ञांनी निश्चित केली आहे तिच्याशी मिळतीजुळती आहे. पुरुष सूक्तातही ग्रहांचे फिरण्याचे मार्ग आहेत. भौतिक, दैविक, आत्मिकही एकमेकांशी पूर्णपणे निगडित आहेत. ज्ञानासाठी त्यांचा विचार पृथक पृथक वाटल्यास करावा. परंतु अध्यात्मचा भौतिकाशी अजिबात संबंध नाही अशी जी विचारसरणी रूढ आहे ती नि:संशय चूक आहे एवढे लक्षात ठेवावे.

३९ व ४५ व्या श्लोकावरील लेखकाने केलेले

स्पष्टीकरणात्मक विवेचन मी इथे मुद्दाम सविस्तर दिले कारण गीतेच्या श्लोकाच्या नुसत्या अर्थावरून हे सर्व कळणे शक्य नाही त्यामुळे हे पुस्तक उपलब्ध झाल्यास अभ्यासकांना खूपच उपयुक्त ठरेल.

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान ॥ २.४५

वेद हे त्रैगुण्यविषयक आहेत. हे अर्जुना, तू त्यांच्या अतीत हो, द्वंद्वाच्या पलीकडे जा. नेहमी स्वस्थ रहा, योगक्षेमातील हो व आत्मवान हो.

दुसरी गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे निस्त्रैगुण्य म्हणजे गुणरहित असा अर्थ केला जातो परंतु त्याचा येथे लागू पडणारा जो यथार्थ आहे तिकडे लक्ष दिले पाहिजे. निस-अतीत, पलीकडे. गुणांच्या पलीकडे, गुणांना सोडून नव्हे तर गुणांना व्यापून. ज्ञान-अज्ञान हे एक द्वंद्व आहे ते परिपूर्ण जाणून घेऊन त्यांना व्यापून-सोडून नव्हे - त्याच्या पलीकडे राहणे म्हणजे निर्द्वंद्व द्वंद्वातीत. द्वंद्व - द्वौ द्वौ सहाभिव्यक्तो manifested in pairs एकमेकांसह अभिव्यक्त झालेली दाने. सत्व, नित्यसत्त्वस्थ, योगक्षेम, आत्मवान वगैरे श्लोकातील कठीण शब्दांची फोड करून त्याचे स्पष्टीकरण केलेले आहे. ते मुळातून वाचणेच इष्ट. सहसा इतके सखोल ज्ञान गीतेवरच्या इतर पुस्तकातून मिळणार नाही. म्हणून मी मुद्दाम त्याबद्दल लिहिले.

ते म्हणतात महाभारताचे सार जर गीता म्हटली तर

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ २.४७

हा श्लोक गीतेचे सार आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा इतका महत्त्वाचा हा श्लोक आहे म्हणून त्याचे खूपच सविस्तर विवेचन त्यांनी केलेले आहे.

सातव्या अध्यायातील १४ व्या श्लोकाचे स्पष्टीकरण पहा -

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरन्ति ते ॥ ७.१४

माया ही तेजस्वी, बलवान अशी परमेश्वराची गुणशक्ती आहे. ही शक्ती व प्रकृती म्हणजे त्याची कर्मशक्ती अशा दोन शक्तींचा उपयोग करून परमेश्वर स्वत:ला उत्पन्न करतो; तेव्हा अशी शक्ती म्हणजे 'जी नाही ती' किंवा 'मृगजळ' वगैरे वर्णन केली जाणारी असेल का? याचा विचार करावा. गुणातीत हो, निस्त्रैगुण्य हो असे गीता सांगते. गुण खरे असतील तर माया खोटी असू शकेल कां? जिला अस्तित्वच नाही, जी केवळ भासच आहे तिच्यायोगे परमेश्वर स्वत:चे सृजन करू शकेल काय ? गुणांची शक्ती मोठी तर त्या गुणांची स्वामिनी जी माया तिचे सामर्थ्य तर फार मोठे असणार आणि म्हणून तिच्यावर ताबा मिळवणे महाकर्म कठीण आहे. तीच गती कर्माची - प्रकृतीची आहे. कर्माची गती गहन आहे. तेव्हा गुणकर्म या ज्या दोन शक्ती परमेश्वराच्या आहेत त्याच्यावर ताबा मिळवणे, त्यांचा उपयोग आपल्याला पाहिजे तसा पाहिजे तेव्हा करता येणे हे दुष्कर आहे. त्याकरिता आपले सामर्थ्य जो सामर्थ्यवान आहे त्याच्या देखरेखीखाली अभ्यास करून वाढविले पाहिजे. असा सामर्थ्यवान परमेश्वर आहे कारण त्याच्याच या दोन शक्ती आहेत. त्याचा आश्रय घेणे म्हणजे शरण जाणे, भीक मागणे नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे. नुसत्या भीकेने काम होणार नाही. महान प्रयत्न हवेत व परमेश्वराच्या दिग्दर्शनानुसार झाले पाहिजेत. हा आत्मा बलहीनांना लाभत नाही. बलवंताना सर्व सुखे मिळतात. देवाच्या मदतीने त्याच्याइतके सामर्थ्य मिळवले तरच ते शक्य आहे. म्हणून जे माझ्याकडे येतात तेच मायेवर ताबा मिळवू शकतात.

अकराव्या अध्यायातील विश्वरूपदर्शनाबद्दल ते म्हणतात, अर्जुनाला दिव्यचक्षू म्हणजे ज्ञानचक्षू दिले असा अर्थ करतात पण हे अद्भूत रुप पहावयास लागणारी शक्तिशाली दृष्टी म्हणजे दिव्यदृष्टी दिली. विश्वरूप पहाण्यास भयंकर आहे. मोठ्या दुर्बिणीतून चंद्र पाहिला तरी माणसे

बेशुद्ध पडतात. कारण जे दृश्य पहाण्याची सवय नाही ते पाहिले की मनुष्य घाबरतो. मग विश्वरूप महाभयंकर म्हणून दिव्यदृष्टीची जरुरी. ते ज्ञानचक्षू नव्हेत. चौतिसाव्या श्लोकाबद्दल ते म्हणतात मारलेल्यांना मारायला सांगणे हा एक विनोदच म्हणावा लागेल. परंतु अर्जुनाच्या मनात गुजन, आप्त यांना मारणे हे पाप, अनिती आहे वगैरे गोष्टींनी थैमान घातले होते ती भीती व्यर्थ आहे हे दाखवून देण्याचा हा प्रयत्न आहे. ज्यांना कृष्णानेच मारले आहे त्याचे पाप तुला लागणार नाही त्याला लागेल तेव्हा तू व्यथित होऊ नकोस. नि:शंक मनाने युद्ध कर हे पटविण्याचा हेतू यामागे आहे.

विश्वरूप पाहून अर्जुन घाबरला. संजय घाबरला नाही तो तर धृतराष्ट्राला सर्व वर्णन करून सांगत आहे. कारण व्यासांनी त्याला दिव्यदृष्टी बरोबर खंबीर मनही दिले होते पण अर्जुनाला खंबीर मन दिले नव्हते. अर्जुन शूरवीर लढवय्या होता. तो फक्त त्याच्यापुरते युद्ध पाहू शकत होता. संजयाला संपूर्ण रणांगणावरची हाणामारी व मृत्यूचे तांडवनृत्य एकसमयावच्छेकरून दिसणार होते व तेथे घाबरून गर्भगळित होणे हे नैसर्गिक होते. ते न व्हावे याची काळजी व्यासांनी घेतली म्हणजे आत्मसाक्षात्कार, कैवल्यज्ञान, ब्रह्मीभूत होणे, तत्त्वज्ञानी होणे वगैरे नव्हे. विश्वरूप ही कल्पना वेद व वेदवाङ्मय यात आहे. म्हणून सर्वांचा अंतर्भाव ज्यात आहे असे ते विश्वरूप.

बाराव्या अध्यायाबद्दल ते म्हणतात, 'हा अध्याय भक्तिपर समजला जातो. भक्ती ही सोपी म्हटले जाते. येथे भक्ती मानाची जी लक्षणे आहेत, भगवंताला प्रिय होणाऱ्या भक्ताकडून ज्या अपेक्षा आहेत, त्यांचा बरवर विचार केला तरी त्या सोप्या वाटणार नाहीत. त्यांचा सखोल अभ्यास केला तरी त्या मिळवणे, त्यात परिपूर्ण होणे किती कठीण आहे, नव्हे छाती दडपून टाकण्याइतके कठीण आहे याची खात्री पटल्याशिवाय राहणार नाही. देवळात जाणे, दर्शन करणे, भजनपूजन, नामसंकीर्तन, जपजाप्य वगैरे वगैरे गोष्टींचा संबंध भक्तीशी जोडला जातो ते ठीक आहे परंतु भक्तीचे यथार्थ स्वरुप जर पाहिले तर तेथेही विश्वरुप दिसेल व घबराट होईल !!

शेवटच्या अठराव्या अध्यायात ते म्हणतात अध्यात्मविद्या ही अत्यंत श्रेष्ठ तितकीच अत्यंत कठीणतम अवघड विद्या आहे, ही गोष्ट मनावर बिंबवावी म्हणजे कंटाळा येणे, दमणे, निराश होणे वगैरे गोष्टीवर ताबा मिळवणे सुलभ होईल. जितकी जितकी सूक्ष्मता अधिक तितकी तितकी ती सूक्ष्म धक्क्यालासुद्धा बळी पडते. या कारणाने भयंकर दक्षता बाळगावी लागते. गुरू महाराज, बुवा, संत, महंत, अवतार यांच्या सहाय्याचा उपयोग फारच थोडा होतो. स्वत:च सर्व प्रयत्न नेटाने, सावधानतेने, सर्व शक्ती पणाला लावून सतत करावे लागतात. दुसऱ्यावर अवलंबून काहीही होणार नाही.

प्रयत्नांनी मनुष्य द्रष्टा बनतो. सतत ध्यास व समत्व राखण्याची पराकाष्ठा व कौशल्ययुक्त अभ्यास या गोष्टी अत्यंत कष्टाच्या आहेत. नाना प्रकारची असंख्य प्रलोभने दुनियेत आहेत. ज्याच्या त्याच्या प्रकृति स्वभावानुसार व नशिबानुसार अडथळे येतात तसेच सहाय्यकही मिळतात. त्यामुळे नाउमेद होण्याचे कारण नाही. प्रयत्न कसोशीने करावा, प्रारब्धाची साथ या कार्यात उपयोगी आणावी ती दुसरीकडे खर्च न होईल याची काळजी घ्यावी. कुठलीही अडचण कितिच जरी जाणवली तरी भगवंताची आठवण करावी, तो योगेश्वर नि:संशय धावून येईल इतकी ती तीव्र असावी. हे केले की तो धावून येईलच याची मनोमन खात्री बाळगावी. यामुळे पतनाची भीती राहणार नाहीच परंतु यशाची वाटचाल हमखास होणार हा आत्मविश्वास निर्माण होईल.

आपले ध्येय गाठताना कुठेही पाय न घसरावा यासाठी प्रथम यथार्थ ज्ञान जरुर आहे. ते सुस्पष्ट असावे याकरिता पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या प्रकारांनी व केव्हा द्विसक्ती व्युक्ती किंवा त्याहून अधिक वेळाही सांगून आपले म्हणणे

ठसवण्याचा भगवंताचा प्रयत्न आहे.

असा हा 'अभ्यासार्थ अमूल्य' असलेला ग्रंथ (पुस्तकावरच असे छापलेले आहे) तुम्हाला कुठे मिळेल ते पुस्तकावरच लिहिलेले आहे.

**आशा भिडे**

बी/९, विजय अपार्टमेंटस्

'आराधना' टॉकीजजवळ, ठाणे (प.) - ४०० ६०२.

दूरध्वनी - २५४१ ०१४०

## परिसर वार्ता

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात यंदापासून चालू झालेल्या वृत्तपत्रिकाविद्या व जनसंपर्क विभागात दुसऱ्या शैक्षणिक सत्रात झी.टी. व्ही. च्या सौ. सुचेता करमरकर, प्रख्यात छायाचित्रकार, बांदोडकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. केदार भट व ॲड. गणेश सोहनी (बांदोडकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ) यांची विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

- संकलित

## फेब्रुवारीतील महत्त्वाचे दिवस

५/२ - निवृत्तीनाथांची पुण्यतिथी

१०/२- धर्मनाथ बीज

११/२- मुस्लिम नव वर्षारंभ (हिजरीसन १४२६ प्रारंभ)

१२/२- माघी चतुर्थी- गणेश जयंती

१३/२- वसंत पंचमी

१५/२- रथसप्तमी

१७/२- क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांची पुण्यतिथी

१९/२- छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती

१९/२- गोपाल कृष्ण गोखले पुण्यतिथी

२०/२- मोहरम (ताजिया)

२१/२ विश्वकर्मा जयंती

२४/२- मुद्रणदिन

२६/२- स्वातंत्र्यवीर सावरकरांची पुण्यतिथी

२७/२- संत नरहरी सोनारांची पुण्यतिथी

२८/२- राष्ट्रीय विज्ञान दिन

- संकलित

**दिशा**

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# सांस्कृतिक युद्धे व ऋग्वेदीय अग्नि

*संघर्षाचे वैचारिक मूळ तपासले तर कोणते निष्कर्ष निघतील याचा हा विचार - संपादक*

**सांस्कृतिक महायुद्धे**

सॅम्यूएल हटिंग्टन यांच्या 'The Clash of Civilizations and the Remaking of world order ह्या पुस्तकात एक जागतिक भविष्य वर्तवण्यात आले आहे. 'जगातील संघर्ष' जो शीतयुद्ध किंवा दहशतवाद या पद्धतीने चालला आहे त्याचे पर्यवसान 'सांस्कृतिक युद्ध' वा कलह या स्वरूपात होणार आहे.

कोण आहेत हे हटिंग्टन साहेब ? त्यांच्या ह्या भाकिताचे महत्त्व काय?

**महायुद्धाचे भौतिक स्वरूप**

सॅम्यूएल हटिंग्टन हे अमेरिकेतील हार्वर्ड युनिव्हर्सिटीतील एक विद्वान 'पोलिटिकल सायंटिस्ट' आहेत. जगातील राजकीय संघर्षाचे त्यांचे निदान हे मुख्यत: अमेरिकन समाज, सरकार ह्यांच्या हिताच्या रोखाने आहे.

९/११ रोजी प्रसिद्ध मुस्लिम दहशतवाद्यांनी बिन लादेन ह्याच्या नेतृत्वाखाली 'वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या' दोन 'हायराईज' गगनचुंबी टॉवर्सवर जो अमानुष, आत्मघाती 'जेट' विमानांचा हल्ला चढविला - हे जरी नैमित्तिक कारण असले तरी जागतिक मानवी समाजाच्या संदर्भात व राष्ट्राराष्ट्रांत विभागलेल्या मानवी समाजाच्या ऐतिहासिक, मानवी वैचारिक बदलावर केलेली ती एक मार्मिक टीका आहे. म्हणूनच तिचा परामर्श घेणे आवश्यक ठरते.

**संघर्षाचे मूळ**

ह्या पृथ्वीवर 'मानव' हा 'फॉर्म' उदयाला आल्यापासून त्याचे आपआपसात अनेक हिंस्र, अमानुष संघर्ष, युद्धे झाली आहेत. त्यांचा तपशील मांडण्याचा या लेखाचा उद्देश बिलकुल नाही. पण, त्यातील संघर्षाचे वैचारिक मूळ, प्रवृत्तीतील मूळ, आदर्शातील वाद, जीवननिष्ठा तपासल्या तर काही ढोबळ निष्कर्ष जरूर काढता येतील.

**संघर्षाचे विषय**

जगण्यासाठी लागणारी साधने व संपत्ती यांचे लढे पृथ्वीच्या मानवी इतिहासात नमूद झाले आहेत. जमीन, गायी, घोडे, हत्ती, रोख संपत्ती, सोने, चांदी एव्हढेच काय पण स्त्रिया वगैरे युद्धाचे व लुटीचे विषय होऊन गेले आहेत.

**बलीयुद्धे**

पण जेव्हा समाज हा राजे, जहागिरदार, सरदार ह्यांच्या अधिकारात विभागला गेला, तेव्हा त्या निरनिराळ्या सत्ता संघर्षात ह्या पृथ्वीवरील किती एक शतके रक्तबंबाळ व जीवहानीने बरबटलेली आहेत. याची मोजदाद करणे कठीण आहे.

**राष्ट्रयुद्धे व आसुरी जगज्जेते**

त्यानंतर ... (खऱ्या अर्थाने राष्ट्र नव्हे) ह्यामध्ये भौगोलिक संदर्भात, जेव्हा समाज विभागला गेला. तेव्हा ह्या राष्ट्रांच्या संघर्षात अनेक हिंसाचारी महायुद्धे झाल्याची नोंद ही पृथ्वी व सूर्य, चंद्र देखील देतील. चंगीझखान, तैमूरलंग, बाबर, अलेक्झांडर, सिकंदर, ज्यूलियस सीझर वगैरे व्यक्तिमत्त्वे ह्या प्रवृत्ती व विचारांचीच द्योतक समजली पाहिजेत.

**धर्मसंघर्ष**

त्यानंतर आले 'धर्मसंघर्ष'. क्रुसेडस, रोझबॉरस् पोर्तुगीजांचे गोव्यातील व इतरत्र ख्रिश्चनांचे 'इन्क्विझिशन'

(सक्तीचे धर्मांतर), मुसलमानांचे 'जिहाद' युद्ध वगैरे या नंतरच्या संघर्षाचे मूळ आहे.

अजूनही या २१ व्या शतकात ह्या धार्मिक वादांचे संघर्ष निरनिराळ्या मुखवट्यांच्या आड दडून चाललेले दिसतात.

**लँड व मार्केट**

जमीन संपादण्यासाठी झालेले 'टेरिटोयिल सत्ता' हे संघर्ष वा युद्ध मागे पडून त्यांची जागा 'मार्केट कॅपचर' (बाजारपेठा बळकावणे) ह्यांनी घेतलेली दिसेल.

**पक्षपाती अज्ञानी विचारवंत**

सर्वांत गंमत म्हणजे, सध्याच्या सुसंस्कृत व सज्जन माणसाला, ह्या सगळ्या गोंधळाचे, हिंसेचे, निदर्यपणाचे, मूर्खपणाचे आश्चर्य वाटले, तरी एक गोष्ट निश्चित आहे की त्या त्या संघर्षांच्या वा युद्धाच्या संदर्भवेळी असलेल्या सुबुद्ध विचारवंताना त्या संहाराबद्दल काही 'अपराधी भावना' किंवा चूक वाटत नव्हती, तर त्यांनी वेळोवेळी आपल्या 'विलक्षण प्रभावी बुद्धीच्या व तर्क व न्याय बुद्धीच्या जोरावर, ह्या संघर्षाचा, युद्धांचा पाठपुरावा व गौरव व त्याचे जोरदार समर्थन केलेलेच आढळेल.

**पशुवृत्ती हा स्थायी भाव**

असे का व्हावे? ह्याचे कारण थोडे धक्कादायक व उपमर्दकारक वाटेल. ह्याचे कारण सर्वसाधारण मानव व त्याचे बुद्धिमान विचारवंत व शूर नेते हे सर्व 'एका पशुवृत्तीचे' प्रतिनिधी होते.

"Animal Instinct & Consciousness" असे त्याचे सार्थ वर्णन करता येईल.

थोडासा सहानुभूतीने विचार केला तर सांगता येईल की त्यांची बुद्धी व न्यायबुद्धी व तर्कसंगती ही एका पशुतुल्य मनाची व वृत्तीची गुलाम होती. त्या बुद्धीवर ह्या तामसी विचारांचा पगडा होता. ती बुद्धी स्वतंत्र मानवी चीज नसून, एका तामसी व पशू वृत्तीने बांधलेली शृंखलाबद्ध अशीच गोष्ट होती.

**संहाराची व्याप्ती व वृद्धी**

नाहीतर, मानवी मुंडक्यांच्या गंडमाळा घालणारे नेते हे तत्कालीन सामाजिक पुढारी कसे होते. त्यांची सत्ता तो समाज का मानत होता. तसेच हिरोशिमा व नागासाकी ह्या जपानी शहरांवर Testing Ground म्हणून पहिला 'अॅटम बॉम्ब' टाकणारे अमेरिका हे राष्ट्र शांततेचे व जागतिक पोलीसांचा दर्जा कसे मिळवू शकले. हिटलर व स्टालीन यांनी एकाने 'गॅस चेंबर्स'मध्ये ज्यूंचे शिरकाण व दुसऱ्याने कॉंसेंट्रेशन कँप येथे केलेले मानवसंहार क्षम्य कसे ठरावेत. अगदी अलीकडे चीनच्या पेकिंग या राजधानीत 'टिनमिन स्केअर' या चौकात लाखो स्वकीय चिनी निदर्शने करणाऱ्या तरुणांचा संहार आणि तोही 'Cultural Revolution' म्हणजे 'सांस्कृतिक क्रांति' ह्या सोज्वळ नावाखाली कसा गळी पचवावा - ह्याचे उत्तर सहजासहजी मिळणार नाही. मानवी बुद्धीच्या शुद्धतेवर व सात्विकपणावर हे जे रंगीत दूषित 'गॉगल्स' आहेत ते काढल्याशिवाय हे 'सत्य' दिसणार नाही.

**आत्मपरीक्षणाचा अभाव**

मानवी बुद्धीची व मनाची दुर्बलता ही आहे की तिच्या 'स्वाभाविक स्थितीचे' सत्यावलोकन करण्याची क्षमता तिच्यात नाही. आत्मपरीक्षण हा नुसता गोंडस साहित्यिक शब्द आहे. ती क्रिया बिलकुल अवगत नाही. कारण ती योगीक आहे !

इतिहासात ह्या प्रत्येक हीन व निंद्य अशा घटनांच्या काळी हा हिंसाचार कसा आवश्यक आहे व त्याचे उद्देश किती स्वच्छ आहेत, हेच तत्कालीन सहजो, सहकालीन विचारवंत सांगत होते. एव्हढेच काय पण प्रत्येक संघर्ष एका 'आदर्शवादी ध्येय स्वप्नांचा मुखवटा घालूनच येत होता पण 'मुखमे राम लेकीन बगल में छुरी' अशा धाटणीने,

प्रत्यक्षात मानवी मनाच्या तळाशी छामपणे लपलेला तामसी पशू हा 'रामाचा मुखवटा' घालून 'रावण युद्ध' करत होता.

**ऋग्वेदीय अग्नी**

आता हे ओळखायला जी त्रयस्थ किंवा स्थितप्रज्ञ किंवा सात्विक प्रज्ञा लागते ती सहजासहजी स्फुरत वा मिळत नाही वा उपलब्ध नसते. ती 'कमवावी' लागते. त्याला तपस्या व योगबळ लागते. आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीमध्ये 'अग्नी'च्या सहाय्याने कॉंशसनेसमधील हा बदल- 'सांस्कृतिक बदल' घडवून आणावा लागतो. खरी 'सांस्कृतिक क्रांति' या 'यज्ञरूपी' प्रयत्नात आहे. हा 'अग्नी' म्हणजे भौतिक आग वा ज्वाळा - 'फायर' नव्हे तर ऋग्वेदात संबोधलेला 'अग्नि' ही वैश्विक आध्यात्मिक उन्नतीची शक्ती आहे.

**वैदिक संहिता**

ह्या शक्तीची ओळख, जाणीव, ज्ञान व तिच्या क्रिया आज जरी खऱ्या अर्थाने उपलब्ध नसल्या, अवगत नसल्या तरी त्या वैश्विक, अव्यक्तातील शक्तीच्या आवाहनाच्या क्रिया वैदिक काळात होत्या ते वेदांच्या संहितेवरून दिसते.

**कुत्स अंगिरस एक पुरावा प्रातिनिधिक**

उदाहरणार्थ, कुत्स अंगिरस ह्या वैदिक ऋषीने रचलेली खालील ऋचा पहा. ह्या ऋचेचे इंग्रजी भाषांतर मी 'Hymns to the Mystic Fire' ह्या श्री. अरविंद (पॉंडिचरी) ह्यांच्या ग्रंथातून उद्धृत केले आहे.

महायोगी श्री. अरविंद ह्यांच्या भाषांतराला मी असे विशेष महत्त्व देतो की त्यांच्या 'The Secret in Vedas' ह्या पुस्तकात व 'Hymns to Mystic Fire' ह्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी सविस्तरपणे व सयुक्तिकपणे वेदांचे किती चुकीचे अर्थ लावण्यात आले याचा इतिहास व कारणे विशद केली आहेत. हे वैदिक ऋषी म्हणजे - (Oxford Cambridge and Harvard) ऑक्सफर्ड, केंब्रिज, हार्वर्डचे भौतिकवादी विद्वान नव्हेत किंवा भारतीय शुष्क ज्ञानी 'कर्मकांडी' नव्हेत तर वेदकाळीचे 'कवि' म्हणजे 'सत्य ऐकणारे द्रष्टे' होते. त्यांच्या ज्ञानाची साधने योग, समाधी, श्रुती, अपरोधानुभूती व शुद्ध सात्त्विक बुद्धी ही होती. आज त्याचा पुसटता स्पर्श व ज्ञान दिसत नाही.

**सूक्त ९४**

इमं स्तोममर्हते जातवेदसे रथमिव सं महेमा मनीषाया ।
भद्रा हि नः प्रमतिरस्य संसद्यग्ने सख्ये मा रिषामा वयं तव
॥१॥

**भाषांतर**

This is the omniscient who knows the law of our being and is sufficient to his works; let us build the song of his truth by our thought and make it as if a chariot on which he shall mount, when he dwells with us, then a happy wisdom becomes ours. With him for friend we cannot come to harm."

यस्मै त्वमायजसे स साधत्यनर्वा क्षेति दधते सुवीर्यम् ।
स तूताव नैनमश्नोत्यंहतिरग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥२॥

**भाषांतर**

Wheoever makes him his priest of the sacrifice, reaches the perfection that is the fruit of his striving, a home on a 'height of being', where there is no warring and no enemies; he confirms in himself an ample energy; he is safe in his strength, evil cannot lay its hand upon him."

शकेन त्वा समिधं साधया धियस्त्वे देवा हविरदन्त्या हुतम् ।
ह्युश्मस्यग्ने सख्ये मा रिषामा वयंतव ॥३॥

**भाषांतर**

This is the fire of our sacrifice ! May we

have strength to Kindle it to its height may it perfect our thanghts. In this all that we give must be thrown that it may become a food for the gods; this shall bring to us the godheads of the infinite consciousners who are our desire."

### संस्कार क्रियेतील आगम

या ऋचा म्हणजे एखादे काव्यात्मक साहित्यिक वर्णन नव्हे तर ह्या विश्वातील अगम्य, अव्यक्त अशा सिद्ध धर्माचे म्हणजे वैश्विक नियमांचे कार्याचे दुर्लभ दर्शन आहे. हा 'अग्नी' omniscient म्हणजे सर्वज्ञानी आहे. त्याला माझ्या पृथ्वीवरच्या जैविक अस्तित्वाचे पूर्ण व सत्य ज्ञान आहे. असे पूर्ण ज्ञान आजच्या वैद्य, डॉक्टर, मेडिकल सायन्स, सायकॉलॉजिकल मानवी तज्ज्ञांना नाही आहे.

सर्वात आनंददायी गोष्ट म्हणजे त्या अग्नीला जे कार्य माझ्या शरीरांत, अंतरंगात, मनाच्या गाभ्यात आणि कॉंशसनेसमध्ये करावयाचे आहे किंवा करवून घ्यावयाचे आहे त्याकरिता हा 'मानवी फॉर्म (रूप) (Rupa) हे समर्थ किंवा परिपूर्ण आहे. म्हणजे ह्या विलक्षण कॉंशसनेसमधील क्रांतिकारी सांस्कृतिक, सात्विक व मूल्यात्मक बदल करण्यासाठी ही उत्तम लॅबोरेटरी आहे.

दुसऱ्या क्रमांकातील ऋचेमध्ये ह्या जीवाच्या बाजूने विचार आहे. जो कोणी ह्या 'यज्ञाला' तुझी (अग्नीची) योजना करील तो 'पूर्णत्वाकडे' जाईल.

प.पू. गोळवलकर गुरूजी ह्यांचाही उपदेश परिपूर्ण मानव निर्मिती हाच होता. महायोगी अरविंद यांचाही आदेश Divine Life हे ध्येय गाठण्याचाच होता. मग इतर संस्कृती व धर्म व देश ह्यांचा काय निराळा होता काय? तर वरकरणी बघता त्यांचाही हेतू हाच होता. पण स्वप्न पहाणे आणि त्याची पूर्तता करणे ह्यात फरक आहे. प.पू. गोळवलकर गुरूजी ज्या आर.एस. एस. संघटनेचे गुरू होते ते या 'अध्यात्ममार्गाचे' योगमार्गाचे खऱ्या यज्ञाचे पुरस्कर्ते होते. वेदांतील सुचविलेल्या सत्य योजनेच्या क्षमतेवर व धर्माचरणांवर त्यांचा विश्वास होता. श्रद्धा होती व त्याचा ते पुरस्कार करत होते. तसेच महायोगी अरविंद ह्यांनी भौतिक राजकारण व रक्तक्रांतीच्या स्वातंत्र्य लढ्यातून अंग काढून पॉंडिचरी येथे नवा योग मार्ग (Integral Yoga) 'परिपूर्ण सर्वांग योगाचा' मार्ग शोधून, त्याचा पुरस्कार केला व एक प्रयोगशाळा 'मदर' (मेरी रिचर्ड) हिच्या माध्यमातून स्थापन केली. त्यांची 'Evolution' ही कविता वाचा.

### अहिंदू धर्मातील अपुरेपणा - उणीवा

इतर धर्मात ह्या 'ध्येयाबद्दल' मतभेद नसला तरी त्यांचे व्यवहारी प्रयोग मानवी दोषांनी भरलेले दिसतील. राजकारण, तलवार, धर्मसत्ता ह्यांच्या भौतिक व पृष्ठभागावरच्या वरवरच्या बदलांपुढे त्यांचे पाऊल पडलेले दिसणार नाही. उलट, कित्येक विकृत विचार व वर्तनाचे नमुनेच सापडतील.

### भारतीय यज्ञ

या देशात, ऋग्वेद व इतर वैदिक ज्ञानाच्या आधारावर, ह्या 'वैश्विक गुह्य योजनांचा' वापर व योजना ह्या उपक्रमात व 'यज्ञात', संबोधलेल्या दिसतील. हा फार मौलिक फरक आहे. तिकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.

### यज्ञाचे पौरोहित्य व फलित

ह्या ऋचेत, हा 'कुत्स अंगिरस' ऋषी पुढे म्हणतो की एकदा 'अग्नी' ह्या पुरोहिताची यज्ञाच्या अधिकारपदी योजना व स्थापना केली की स्वत:च्या प्रयत्नाने हा पृथ्वीवरचा जीव (मानवी) त्याच्या उपक्रमाची फलसिद्धी मिळवू शकेल आणि अशा एका 'उंचीपर्यंत' त्याची जैविक कॉंशसनेसची पातळी नेईल की तिथे 'नसेल युद्ध-नसतील शत्रू'!! स्वत:मध्ये तो एका विलक्षण शक्तीचे दर्शन व प्रकटीकरण अनुभवू शकेल. स्वत:च्या सामर्थ्यावर त्याचा विश्वास व श्रद्धा बसेल आणि मग असुरी वृत्ती आणि इतर शत्रू त्याच्यावर हात टाकू शकणार नाहीत.

तिसऱ्या ऋचेत हाच विचार व क्रिया पुढे नेतात व सांगतात की, हा आपल्या यज्ञातील 'अग्नी' आहे. आपल्याला त्याच्या पूर्ण सामर्थ्याचे - उंचीचे प्रकटीकरण करण्याचे सामर्थ्य - आवाहनाच्या क्रिया करण्याचे सामर्थ्य, येऊ द्या. ह्या क्रियेमध्ये ज्या ज्या गोष्टींचा त्याग करावयाचा - समर्पण करावयाचे ते ते ईश्वराच्या प्रसादाचे भक्ष होऊ द्या. ह्या क्रियेने आपल्याला ईश्वरपद प्राप्त होईल - दैवी संपदा प्राप्त होईल आणि सत्य व अमर्याद अशा कॉशसनेसची प्राप्ती होईल व जी खरोखर आपली मनीषा, इच्छा, आकांक्षा आहे.

### संस्कृतीचे भौतिक स्वरूप

ह्या विस्ताराने वेदिक ऋग्वेदीय अग्नीचे वर्णन करण्याचे प्रयोजन काय असा प्रश्न स्वाभाविकपणे पडेल.

पण, त्याचे मुख्य कारण म्हणजे 'संस्कृतींचा लढा जर जगाच्या कपाळी भविष्यकाळात लिहिला असेल, तर मुख्य प्रश्न येतो - उद्‌भवतो तो हा की संस्कृती म्हणजे काय? इंग्रजीभाषेत त्याला Culture आणि Civilization असे पर्यायी शब्द आहेत. हटिंग्टन साहेबाने जगातील अशा ७ महत्वाच्या संस्कृत्या शोधून काढल्या आहेत. त्यांच्याच शब्दात त्या अशा Sinic, Japanese, Hindu, Islamic, Orthodox, Western and Latin American

हटिंग्टन साहेब हे प्रोफेसर ऑफ गव्हर्नमेंट - हार्वर्ड आणि ओलिन सेंटर ऑफ स्ट्रॅटेजिक स्टडीज यांच्याशी संलग्न आहेत. त्यांच्या आणखी एका पुस्तकाचे नाव Political Order in changing Societies (1968) असे आहे. त्यांचे एक निरीक्षण असे आहे की 'लोकशाही' ही वेस्टन संस्कृतीची निर्मिती आहे व इतर जगावर म्हणजे संस्कृत्यांवर लादण्याचा उद्योग चालला आहे त्याचे पर्यवसान वेस्टर्न जगावर Cultural Imperialism चा आरोप होण्यात होणार आहे. अशाच तऱ्हेने इतर अनेक अभ्यास स्पेंग्लर, टॉयनबी व फुकूयामा या इतिहासकारांनी केले आहेत. हटिंग्टन साहेबाच्या अभ्यासाला महत्त्व एव्हढेच की त्यांच्या सल्ल्याचा दृश्य परिणाम त्याचे धनी म्हणजे अमेरिकन सरकार व राष्ट्र अंमलात आणू शकतील. ह्याचा अर्थ वेस्टर्न संस्कृतीमध्ये जे 'Opinion Makers' जनमत बनवणारे कारागीर आहेत त्यांत हटिंग्टन साहेबाचा अंतर्भाव होतो.

मग ह्या संस्कृत्या किती, त्यांच्यापासून काय धोका आणि त्याबद्दल 'अमेरिकन सरकार किंवा वेस्टर्न राष्ट्रे यांनी काय धोरण आखावे एव्हढाच व्यवहारी व संकुचित विचार आहे.

### संस्कृतीचा खरा अर्थ व हेतू

निरनिराळ्या संस्कृत्या का अस्तित्वात आल्या त्याचे बीज कशात आहे - याचा अभ्यास अंतर्भूत किंवा अपेक्षितच नाही.

एव्हढेच नव्हे तर जर मानव हा मर्त्य आहे व प्रत्येक पिढी ६०/१०० वर्षांनी जवळजवळ नवीन जीवांनी व्यापली जाते, तर मग ह्या संस्कृत्या टिकतात कशा व ह्या संस्कृतीची वाहक क्रिया कशी होते - हे प्रश्न त्यांना हाताळवयाचे नाहीत.

शिवाय या संस्कृतींतील मानवी किंवा दैवी उंची कशी मोजावी व कोणती संस्कृती जागतिक / वैश्विक होण्याच्या लायकीची आहे याचा विचार नाही.

त्यांचा उपद्व्याप फक्त व्यावहारिक व तोही एका संकुचित राष्ट्राच्या 'हिताच्या' दृष्टिकोनांतूनच होतो आहे.

शिवाय, मानवी मनावर संस्कार कसे होतात? एका पिढीतले संस्कार पुढच्या पिढीत कसे संक्रमण होतात? याचा अभ्यास नाही. तो हेतूही नाही.

### दैशिक शास्त्र

सबंध समाज सुसंस्कृत करण्याचे एक भारतीय शास्त्र आहे. त्या शास्त्राचा आधार वेद, उपनिषद, योग. आचार, विचार यावर आहे. त्या शास्त्राचे नाव 'दैशिक शास्त्र'. ह्या

शास्त्रावर अधिकार असणारे नजिकच्या काळात एक ऋषी होऊन गेले त्यांचे नाव श्री १०८ सोंबारी महाराज'.

भौतिकतेच्या पलिकडे

आहार, निद्रा, मैथुन ह्यात गुंतलेल्या पशुतुल्य व्यक्ती व समाज यांना संस्कारित करणे व श्रेष्ठ मानव बनवणे हा प्रयत्न निव्वळ भौतिक असूच शकत नाही. ह्या प्रयत्नांत अव्यक्त (unmanifest) जगातील काही दैवीशक्तींचा हातभार लागावा लागतो. मानवी मनाचे हे बदल Transformations हे उथळ असून चालत नाही. शिवाय ह्या संस्कारांचा प्रयत्न किंवा यज्ञ हा जन्मजन्मांतरी सलग व्हावा लागतो. अर्थातच, फक्त हे जीवन हे 'एकच व अंतिम' असा भौतिकी विचार केल्यास किंवा तसाच विश्वास असल्यास, हा कार्यक्रम अशक्यच आहे. तसेच, केवळ विद्वत्ता व बुद्धीची सरळ रेषेतील (Linear) वाढ अशी संस्काराची व्याख्या केल्यास संस्कार म्हणजे काय याचेच ज्ञान नाही असे म्हणावे लागेल.

संस्काराची व्याख्या

Swami Vivekanand defined Civilization as the manifestation of divinity in man. He again said, 'The more advanced a soceity or nation in Spirituality, the more is that society or Nation civilized. No Nation can be said to have become civilized only because it has succeeded in increasing the Comforts of material life by machinery and things of that sort. (The complete works of Swami Vivekanand, 462)

दैवी संपदा

तेव्हा संस्कृती मोजण्याची फूटपट्टी ही 'दैवीसंपदा' व 'आध्यात्मिक उन्नती' ही आहे. पण ह्यातला एक शब्द महत्त्वाचा आहे तो Manifestation. ह्याचा अर्थ अव्यक्तांतले काहीतरी हस्तगत करून ते व्यक्तात-भौतिकात आणणे (To manifest it). संस्काराचा एखादा भौतिक ''जीन'' विज्ञानाला सापडला नाही, सापडणार ही नाही जोपर्यंत संशोधन भौतिक स्वरूपाचे आहे. कुठले व किती प्रकारचे संस्कार ह्या प्रयोगात वा यज्ञात सामील आहेत? गर्भाधान, ऋतुदान, पुंसवनम, समिन्तोयनम्, जातकर्म, नामकरण, निष्क्रमरण, अन्नप्राशन, चूडाकर्म, कर्णवेध, उपनयन, वेदारम्भ, ब्रह्मचारिकर्तव्य उपदेश, समावर्तन, विवाह, गृहाश्रम, गृहस्थोपदेश, पंचमहायज्ञ, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम व शेवटचा अंत्येष्टिकर्म संस्कार.

डायरेक्टर (वैश्विक) (मानवी संस्कार डिपार्टमेंट)

याचा अर्थ एखाद्या वैश्विक मानवी संस्कार क्रियेचा 'डायरेक्टर' पृथ्वीवर पाठवलेल्या जीवाला या जवळ जवळ १६ संस्काराच्या लॅबोरेटरी प्रयोगातून नेऊन शेवटी देह त्याग करताना देहावर एक शेवटचा संस्कार व अत्म्याच्या पुढील शिक्षणासाठी एक पासिंग सर्टिफिकेट देणार अशी होती व्यवस्था !!

भारतीय संस्था

पण, ह्या सबंध खटाटोपाकडे निदान उत्सुकतेने किंवा कुतुहलाने बघणेही हिंदू समाजच विसरला आहे मग त्याच्या अभ्यासाची व शास्त्राची Rediscovery सोडूनच द्या. इतकी विवेकानंद व रामकृष्ण मिशन केन्द्रे आहेत त्यांनी हा कार्यक्रम खरोखर हाताळावयाला हवा. 'संस्कार भारती' ह्यांनी सुद्धा ह्या निखळ संस्कार क्रियेचा पाठपुरावा करावयाला हवा. पण, मी व आमच्या 'स्पिरीच्युअल सायन्स सेंटरने' (ठाणे) हा विषय हाती घेतला आहे. त्यावर संशोधन चालू आहे. तेव्हा ह्या विषयावर विस्तृत चर्चा पुन्हा एकदा केव्हातरी ह्याच मासिकाच्या' पानावर करू.

वेदिक संस्कार

पण, महत्त्वाचा मुद्दा हा 'संस्कार क्रियेचा' हा प्रयोग भारतात वैदिक काळापासून चालू आहे. (परिशिष्ट A, B) त्याची पुनरुत्थापना आवश्यक आहे. १०,००० वर्षांचा

इतिहास व साधना ही हा समाज (civilization) संभाळतो आहे.

### युद्धाचे पोवाडे

ह्या साधनेला आवश्यक असणारी साधने (Instruments & Institutions) म्हणजे गुरूकुल, धर्मश्रद्धा, सामाजिक आचारविचार व आधार देणारी कमीत कमी सहानुभूतीने पहाणारी - 'राजसत्ता' ही पूर्णपणे उद्ध्वस्त आहे. तरी देखील छाती पिटून इथले विद्वान संस्कृतीच्या क्षेत्रात व 'भविष्यातील सांस्कृतिक लढाईला' केवळ 'पोवाड्यांच्या' डफ तुणतुण्याच्या आधारावर उभे रहात आहेत. हे दृश्य खंत वाटणारे आहे. या लेखाच्या माध्यमातून ही जाग येईल, अशी आशा करतो.

### संस्काराची टेक्नॉलॉजी

भारतीय 'आधिजीविक' शास्त्राप्रमाणे मनुष्य हा संस्कारमय असतो.

संस्कार चार प्रकारचे असतात. १) जन्मांतर २) सहज ३) कृत्रिम ४) अन्वयागत

१) शरीर एका शरीराचा त्याग करून दुसऱ्या शरीरात ज्याच्यासह प्रवेश करतो त्यास 'जन्मांतर संस्कार' म्हणतात. ह्याचे वैश्विक 'व्हेओकल' (वाहन) हे 'अमैथुनिक तन्मानिक शरीर' व 'बिंदू' हे आहे.

२) ह्या तन्मानिक शरीरावर बिन्द्वावस्था व गर्भावस्था यात 'सहज' संस्कार प्राप्त होत. त्यातही योनिसंस्कार, जातिसंस्कार व वर्णसंस्कार असे भेद आहेत.

३) जे भौतिक जगात 'सन्निकर्ष' (परिणाम करणारी भोवतालची परिस्थिती) मुळे होणारे संस्कार ते 'कृत्रिम' संस्कार होत.

४) जे आई-वडिलांच्या वंशामुळे प्राप्त होतात ते 'अन्वयागत संस्कार' होत.

### हिंदूंची जबाबदारी

ह्या संस्कारांची अत्यंत खोल, विस्तृत व समाजाच्या विश्वासात व श्रद्धेत ठासून भरलेली जीवनपद्धती हिंदू समाजात आजतागायत रूढ होती.

ह्याचा सरळ अर्थ 'हिंदू समाज व राष्ट्र' एका सांस्कृतिक वैश्विक टेक्नॉलॉजीचा अधिकारी होता. पण, त्यावर मुसलमानी आक्रमण, ब्रिटीश, पोर्तुगीज, फ्रेंच आक्रमणे होऊन ती व्यवस्था विस्कळित झाली. तसेच तत्वज्ञानातही अनेक भेद होऊन जसे बुद्ध तत्वज्ञान वगैरे त्यामुळे देव, दैवी हस्तक्षेप ह्या श्रद्धांना तडे गेले व एका बांधेसूद 'संस्कार यंत्रणेचा' कालांतराने लोप झाला. संस्कारशून्य राज्ययंत्रणेचा अंमल सुरू झाला.

### १६ संस्कार

महर्षि दयानन्द सरस्वती ह्यांचे 'संस्कारविधि:' हे पुस्तक वाचण्यात आले. ह्या संस्कारावर भाष्य लिहिताना ते म्हणतात की त्यांनी त्या ठिकाणी केवळ 'कर्मकांडी' विधाने सांगितली आहेत. सगळ्या मंत्राचा अर्थ वा त्यातील गुह्यक्रिया सांगितल्या नाहीत. त्या समजण्यासाठी त्यांचे 'वेदभाष्य' वाचावयास हवे. हे केल्यावर 'शरीर और आत्मा सुसंस्कृत होनेसे धर्म, अर्थ , काम और मोक्ष को प्राप्त हो सकते है और सनातन अत्यंत योग्य होते है । इसलिये संस्कारो का करना सब मनुष्यों को अति उचित है ।'

**यशवंत साने**

(स्पिरीच्यूअल सायन्स सेंटर)

दूरध्वनी : २५३६ ८४५०

ई-मेल : yrsane@eth.net

परिशिष्ट

# सिद्ध सनातन संस्कृती

(प.पू. श्री.गगनगिरी महाराज ह्यांच्या ग्रंथातील काही उतारे)



१) सिद्ध सनातन संस्कृती (भारतीय हिंदू संस्कृतीचा आदर्श) ही अतिप्राचीन व अनेक ऋषींच्या लाखो वर्षांच्या तपस्येतून-ज्ञानातून-निर्माण झालेली आहे. इतर संस्कृती ह्या अर्वाचीन असून त्यावर मूळ संस्थापकाचा फक्त प्रभाव व नंतरच्या लोकांनी मांडलेली मते ग्राह्य धरली गेली आहेत. नंतरच्या लोकांनी त्यांच्या (मूळ प्रेषितांच्या) नावे धर्म स्थापन करून स्वत:ला समजले. तेव्हढेच लिहिले, त्यातील अनेक मते रुढीवादी व बंधनकारक घातली गेली.

२) सृष्टीची उत्पत्ती कशी झाली? याची वर्णने इतर संस्कृतीत अपूर्ण आहेत. मानवी शरीर, प्रत्येक वस्तू, दृश्य हे स्पंदनलहरींचा समूह आहे. संस्कार ह्या स्पंदनाना शुद्ध करतात.

३) आमच्या ऋषींनी अत्यंत गूढ असे ज्ञान कथांच्या व व्रतांच्या आधारे सामान्य जनांसमोर ठेवले. पारमार्थिक, प्रगती होताच सर्व ज्ञान त्याला आपोआपच मिळत जाईल - अशी सुंदर व्यवस्था केली.

४) प्राचीन ऋषींनी तपस्या करून मूळ ध्वनी (शब्द) याच्या मूळाशी जाऊन नाद, बिन्दु व कला, शून्य, महाशून्य याच्या पलीकडचे वर्णनातीत ज्ञान मिळवले. आत्मज्ञान म्हणजे जीवोब्रह्मैवनापर: हे अनुभव प्राप्त केले.

५) इतर संस्कृतीत इतका सखोल व विस्तीर्णपणा आढळत नाही. त्याचे ज्ञान भूवर्लोकाच्या पुढे जाऊ शकले नाही.

६) सिद्ध सनातन संस्कृतीमध्ये एकापेक्षा एक असे योगविषयक ज्ञान आहे. भक्तीयोग, ज्ञानयोग, राजयोग, लययोग, मंत्रयोग, हठयोग व सिद्धयोग किंबहुना या परमार्थ साधनेच्या चढत्या पायऱ्या आहेत.

सिद्धयोग सिद्ध झाल्यावर पूर्ण सिद्धावस्था प्राप्त होते. प्रत्येक व्यक्तीला याच क्रमाने वर जावे लागते.

७) हा प्रवास करण्यास शेकडो वर्षे लागतात. 'योगभ्रष्ट' म्हणजे साधना अपूरी राहिलेली व्यक्ती श्रेष्ठ मानवकुळात जन्म घेऊन आपली साधना पूर्ण करते.

८) कोट्यावधी प्रवृत्ती मानवी मेंदूत निवास करीत असतात. मानवाला स्वतंत्र विचारशक्ती असल्याने या विकारांवर (षड् विकारांवर) विजय प्राप्त करावयाचा असतो. तशी त्याला शक्ती आहे.

# आनंदाचे डोही

*बालवयातील विकास, ज्ञानग्रहण आणि ललित कला यांचा अन्योन्य संबंध अतिशय घनिष्ठ असतो. त्या दृष्टीने काही विचार मांडणारा हा लेख. - संपादक*

आपली जीवनशैली दिवसेंदिवस अधिकाधिक स्पर्धात्मक, दडपण आणणारी व गुंतागुंतीची होत चालली आहे. अशा वेळी 'कला' या आपल्या मदतीला धावून येऊ शकतात. पण नक्की मानवी मेंदू या कला कशा ग्रहण करतो, याचं बीजारोपण लहानपणीच कशा प्रकारे करता येईल हे आता आपण पाहू.

रुडॉल्फ स्टाईनर (1861-1925) या ऑस्ट्रीयन तत्ववेत्त्याने मनुष्याच्या जडणघडणीबद्दल बरेच संशोधन केलं आहे. (रुडॉल्फ स्टाईनर हे संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, चित्रकार, स्कॉलर असं बरंच काही होते.) "दी इसेंशियल स्टाईनर" या पुस्तकात यावर खूप चर्चा आहे. त्यांची काही तत्वे पुढीलप्रमाणे. त्यांचा पहिला सिद्धांत असा -

१) मनुष्य हा शरीर-मन व आत्मा (Body, Soul and Spirit) या तिन्हींने मिळून बनला आहे. मोठ्या माणसांमध्ये हे तिन्ही घटक निरनिराळे झालेले असतात. म्हणजे असं की समजा मोठ्या माणसाच्या हाताला कापलं किंवा भाजलं तर तो काही मानसिकरित्या किंवा भावनिक पातळीवर खचणारं नाही. तो हाताला औषध लावून आपल्या कामालाही लागेल किंवा मानसिक धक्का पोहोचवणारी घटना घडली तर लगेच तो शारीरिकरित्या तो ढासळेलच असं नाही. (अति तीव्र घटनांमध्ये किंवा अतिसंवेदनशील व्यक्तिमध्ये हे घडूही शकतं) पण लहानांच्या बाबतीत हे तिन्ही घटक जुळलेलेच असतात. त्यामुळे शरीरावरचे परिणाम मनावर, मनावरचा ओरखडा आत्म्यावर, शरीरावर व आत्म्यावरचा घाव मनावर, शरीरावर होतोच होतो. म्हणजेच लहानमूल मोठ्या माणसाची छोटी प्रतिकृती नसून ते मुळातूनच निराळं असतं. त्यामुळे ते त्याच्या संपूर्ण अस्तित्वानिशी त्याच्या वातावरणाला प्रतिसाद देत असतं. (A child responds through his whole being) जुईलीची (वय वर्ष ५) आई दुसऱ्या बाळंतपणासाठी गावी गेली आणि जुईली मात्र शाळेसाठी वडिलांजवळच राहिली. दोन आठवड्यातच जुईली रोड आणि निष्प्रभ दिसायला लागली आणि शेवटी आजारीच पडली. ताप काही केल्या उतरेना. सर्व चाचण्या करूनही कारण समजेना. शेवटी तिला आईकडे नेल्यावर दोन दिवसातच ती पूर्ववत खेळायला लागली. आजारी पडण्याचं कारण मानसिक - भावनिकच होतं - "आईच्या विरहाचं!"

२) लहान मूल त्याच्या वातावरणावर संपूर्णपणे अवलंबून असते. आपण जे वातावरण त्याच्याभोवती निर्माण करू त्यामुळे ते मूल पूर्णपणे प्रभावित होतं. इथे 'पूर्णपणे' या शब्दाला महत्त्व आहे. म्हणजे वातावरणाला चाळणी किंवा गाळणी लावून मुलांना ते घेता येत नाही. चांगलं दिसलं तर ते घ्यावं व वाईटाचा परिणाम होऊ द्यायचा नाही असं विश्लेषण मुलांना करता येत नाही. त्यामुळे जेव्हा जेव्हा आपण लहान मुलांच्या सहवासात असू तेव्हा तेव्हा त्यांच्याबरोबर बोलताना, वागताना, त्यांना काही दाखवताना अशा अनेक वेळीच्या संपूर्ण प्रक्रियेत मुलांची स्वत:विषयीची भावना प्रसन्नतेचीच असावी (Sense of wellbeing) आपण त्याला अर्थहीन ताण, भिती, कमीपणाची भावना या सर्व नकारात्मक भावनांपासून दूर ठेवले पाहिजे.

३) लहान मूल स्वयंप्रेरणेतून म्हणजे स्वत:ला करावाशा वाटलेल्या कृतीतून जो अनुभव मिळतो त्यातूनच ते शिकतं (हे तत्व डॉ. मारिया मॉन्टेसरी यांनी प्रतिपादीत केलं आहे.) त्या म्हणतात फक्त बघून किंवा ऐकून जे ज्ञान

मूल मिळवतं त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने कृती करून शिकतं. मूल जितकं हलतं बोलत राहील तितकी त्याची एकाग्रता अधिक राहील. पण कृती अर्थहीन नसाव्यात व नुसत्या मोठ्यांच्या आज्ञा पाळण्याऱ्याही नसाव्यात. कृतींना एक स्वतःचं छोटसं ध्येय असावं व त्या स्वयंप्रेरित असाव्यात.

या सर्व मुद्यांवरून असं म्हणता येईल की जेव्हा मूल तना-मनानं एकरूप होऊन मोकळ्या मनाने स्वतःहून एखादी ध्येयसिद्ध कृती करत असेल तेव्हाच ते त्यामध्ये पूर्णपणे गुंग झाले असेल व पूर्णपणे एकाग्र झालेलं त्याचं चित्त त्यावेळी खूप काही मिळवत असेल.

**कलांचे एकजिनसीपण**

आता यावरून आपल्याला ज्ञान ग्रहण करण्याची पद्धत आखता येईल. पण त्या आधी ललित कलांचं स्वरूप पाहू.

प्रत्येक ललित कला (संगीत, नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प, साहित्य) ही वेगळी भासत असली तरी त्यांची मूलतत्वे कधी एकच तर कधी समांतर आहेत - लय, भाव, रसनिर्मिती प्रमाणबद्धता, ताल इत्यादी. आणि प्रत्येक कलेचं व्यक्त होण्याचं माध्यम मात्र वेगवेगळं आहे. या सर्व कला एकमेकांमध्ये खूपच घट्ट मिसळलेल्या आहेत. साहित्यिक नाटकाची संहिता आधी तयार करतो. नृत्य गायनावर किंवा वादनावर तालात सादर होत असतं. गायनामध्ये भाव दाखवण्यासाठी अभिनयाची जाण असणं आवश्यक असतं तर चित्र हे थिजलेलं संगीत असतं.

त्यामुळे कलांच्या संकल्पना जर स्पष्ट करून सांगितल्या - अशा कृती करायला मुलांना योग्य वयात वाव दिला असे अनेक अनुभव त्यांना दिले तर एकत्रितपणे मूलं त्यावर विचार करू शकतील व कलाग्रहण सोपं जाईल. तीन ते आठ वर्षांच्या वयामध्ये मुलांना कोणंतीही औपचारिक तालीम (Formal Training) न देता फक्त अनुभव संपन्न करावं.

मुलांना सांगितिक अनुभव देताना त्यामध्ये नृत्यमयता, नाट्यमयता आणणं मोलाचं ठरेल. एखादी गोष्ट तयार करणं, त्यांचं नाट्यरुपांतर करणं मग त्यावर चित्र काढणं. प्रत्यक्ष अनुभव देऊन त्यावर चित्र काढणं किंवा पार्श्वभूमीला संगीत लावून चित्र काढणं असे अनेक अनुभव देता येतील.

मुलांचा शारिरीक विकास मध्यापासून इतर अवयवांपर्यंत होतो. त्यामुळे आधी खांद्याचे स्नायू विकसित होतात. मग कोपराचे मग मनगटाचे आणि शेवटी बोटांचे. त्यामुळे ३ $^{1}/_{2}$ वर्षांच्या मुलामध्ये खांद्याचेच स्नायू बळकट झालेले असतात. अशा वेळी त्यांना बारीक पेन्सिल हातात देऊन लहानशा वहीतील ओळींवर लिहायला लावणे हे किती अन्यायकारक आहे ! आणि मग लिहिण्याबद्दल नावड; वाईट अक्षर या समस्या उद्‌भवल्या तर त्यात नवल ते काय?

**चित्रकला**

याच कारणास्तव चित्र काढायला देताना मोठे मोठे कागद (वर्तमानपत्र ही चालतात) व जुने दाढीचे ब्रश मुलांना देऊन मोठी मोठी चित्रे मुक्तपणे काढू द्यावीत. 'रंगीत खडू' हे माध्यम ही चांगलं पण ते पुसट नाहीत ना हे बघून वॅक्स पेक्षा तैलखडू (Oil Pastels) मिळतात ते वापरावेत ज्याने छान, रंगीत ठसठशीत चित्र तयार होऊ शकतं.

या वयात मुलांच्या हाताचं कौशल्य न बघता त्याच्या कल्पना काय आहेत, चित्रासाठी तो कोणता विषय निवडतो, त्यात त्याने कशाचं चांगलं निरीक्षण केलं आहे या सर्व गोष्टी पहाव्यात म्हणजे चित्र पूर्ण झाल्यावर त्याच्याशी आपण त्याला विचारून चक्क चित्र वाचावं ! मुख्य म्हणजे आपण त्याला त्याच्या चित्राला आदरपूर्वक वागवावं. कोणत्याही प्रकारची थट्टा, तुलना या बाबतीत होऊ देऊ नये. आणि सर्वात महत्वाचं म्हणजे त्याच्या प्रत्यके चित्राला सुंदरच म्हणावे. तरच त्याला उत्तेजन मिळेल. चित्र हे एक भाषेच्या ही आधी प्रगट होणार, व्यक्त होण्याचं चांगलं माध्यम बनू शकतं. आत्मविश्वास वाढणं, भावना विरेचन होणं, हाताचे स्नायू



विकसित होणं असे अनेक गुण चित्रामुळे विकसित होऊ शकतात.

आता आठ ते पंधरा वर्षाच्या मुलांसाठी-चित्र ही एकच कला शाळेत घेतली जाते. शिक्षक चित्राचा विषय ठरवतात. त्या विषयावर मुलांशी चर्चा होते का? ते दृश्य स्थान मुलांनी बघितलंय का? त्याचा जिवंत अनुभव मुलांनी घेतलाय का त्यातून त्यांची स्वतःची अभिव्यक्ती होते का? कृती स्वयंप्रेरीत आहे का? असे अनेक प्रश्न उभे राहतात. अनेक ठिकाणी तर शिक्षकच चक्क फळ्यावर चित्र काढून दाखवतात (झालंच तर ते लगेच पुसून टाकलं जातं) आणि मग मुलं ते चित्र काढतात म्हणजे हमखास ते चित्र शिक्षकांसारखेच आणि सर्व मुलांची चित्र सारखी ! बाईसारख्या चित्रांमुळे बाई खूश व भरपूर मार्कस् म्हणून मुलं खुश !!

पण या सबंध प्रक्रियेमध्ये मुलांना काही नवीन ज्ञान मिळालं का त्यांची सृजनशीलता विकसित झाली कां ? निरीक्षण करण्याची संधी त्यांना मिळाली का? त्यांच्या भावनांना वाट मिळाली? यातलं काहीही झालं नाही असंच खेदानं म्हणावं लागेल.

प्रत्येक चित्रकार त्याला प्रत्यक्ष भावलेली, जाणवलेली संकल्पना / दृश्य चित्रीत करतो. त्यासाठी मुळात तो आधी त्या घटनेचा, दृश्याचा अनुभव घेतो; त्यावर चिंतन करतो आणि मग चित्र तयार होते. मग ही मुभा मुलांना का नाही? अनुभव गृहीत धरून कसं चालेल? मग इतर कलांच्या सहाय्याने अनुभव जिवंत करता येईल का?

समजा 'रेल्वे स्टेशन' हा अनुभव रेखांकित करायचा असेल तर प्रत्यक्ष Field Trip हा तर उत्तम पर्याय. Field Trip नंतर मुलांना बोलतं केलं तर लक्षात येईल की कुणाला प्लॅटफॉर्मवरची गाडी आवडली असेल, कुणाला मोठ्ठ घड्याळ अधिक भावलं असेल, कुणाला इंडिकेटर तर कुणाला बूटपॉलीश करणारा तो मुलगा जवळचा वाटला असेल तर कुणाला माणसांची गर्दीच गर्दी पाहून अस्वस्थता आली असेल. यामुळे प्रत्येकाचं चित्र वेगळं होईल. त्यातून त्याच्या मनातील भावनांच / स्वभावाचं दर्शन घडू शकेल. प्रत्येकाला स्वतःच्या चित्रावर दोन मिनिटे बोलतं करता येईल. याप्रमाणे विचारांची देवाण-घेवाण करण्याची सवय मुलांना लागू शकते.

सगळ्यांनी मिळून या अनुभवावर गोष्ट तयार करता येईल. कोणी कविता करेल. एखादं नाटक ही लिहिता येईल. कोणी त्या कवितेला चाल लावू शकेल तर पुढे त्या गाण्याची सांगितीका ही बसवता येईल. तर कागद-पुठ्ठा इ. सामग्री वापरून आगगाडीच्या स्टेशनची प्रतिकृतीही बनवता येईल.

अशा तऱ्हेने मुलांचा सर्वांगीण विकास साधता येईल. मुलांमधील वैशिष्ट्यांची आपल्याला नीट ओळख होऊ शकेल. एखाद्या गुणातील नैपुण्य लक्षात आल्यावर त्यामध्ये मुलांना विकसित करण्यासाठी वेगळा भर देता येईल. कुणाच्या कल्पना चांगल्या असतील तर कुणाची रंगसंगती सुंदर असेल. कुणी उपजतच गाण्यात शब्द गुंफत असेल, कुणी हुबेहुब अभिनय वठवत असेल तर कुणी चांगला दिग्दर्शक असेल !

असा एक दृष्टिकोन आपण पहिल्यापासूनच मुलांना घरच्या घरीच देऊ शकलो तर उत्तमच. कारण खरंतर घरच अनेक गोष्टी अनुभवण्याचं, शिकण्याचं माहेर असतं. असे कलेच अनुभव घेणं खूपच आनंददायी असतं - मुलांसाठी तर खरंच पण आपल्यासाठीही ! हे सर्व करताना सुंदर अनुभव दोघांच्या पदरात पडतोच पण दोघांमधले नाते ही दृढ होत जाते.

- रश्मी कुलकर्णी

१४, कमल सोसायटी, सोपान जवळ,

गजानन महाराज चौक, राममारुती रोड,

ठाणे (प.)- ४०० ६०२.

दूरध्वनी : २५३७ ७६३०

# माझा शैक्षणिक प्रवास व ग्रंथालये

*ग्रंथालय सेवा समूहाने घेतलेल्या निबंध स्पर्धेत खुल्या गटातील पारितोषिक प्राप्त असा हा निबंध. ग्रंथालयांचे स्थान किती महत्त्वाचे असू शकते हे या लेखातून समजण्यासारखे आहे.* - संपादक

माझं बालपण अलिबागला गेलं. बालपणात ग्रंथालयाची कल्पना नसते. तरी पण समुद्राकाठी एक ग्रंथालय आहे, हे मी पाहिले आहे.

नंतरचे शिक्षण मुंबईत झाले. शाळेत ऑफ पिरिएडला पुस्तकं वाचायला देत असत. माझे थोरले बंधू प्रा. रमेश तेंडुलकर कॉलेजमध्ये शिकत होते. त्याच्यामुळे दादरला मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची ओळख झाली. तो अवांतर पुस्तके अनेक वाचे. त्यामुळे आमचे घरच ग्रंथालय झाले. त्यात इंग्रजी ग्रंथही असत. सॉमरसेट मॉमचं Summing up व इतर पुस्तके वाचनात आली. The art of living नावाचं पुस्तक वाचले. खलील जिब्रॉनची पुस्तके वाचली. मॅक्झिम गॉर्कीचा परिचय झाला. शाळेत माझं इंग्रजी चांगलं होतं. माझ्यासाठी खास इंग्रजीतून मराठीत भाषांतरे आमचे सर लिहायला सांगत. त्या काळात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, पं. जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी यांच्या ग्रंथातील उतारे शोधून काढून मी भाषांतरे सादर करीत असे.

सर्व विषयात चांगली गती असूनही वाङ्मयाकडे जास्त कल होता. नाथ माधवांच्या कादंबऱ्या, ना.सी. फडके यांचं सुंदर ललित लेखन, वि.स.खांडेकरांचं आदर्शवादी लेखन, साने गुरुजींची वात्सल्यपूर्वक पुस्तके मी वाचली माझा पाया भक्कम झाला.



मी नोकरी करून शिक्षण घेत असल्यामुळे सिद्धार्थ कॉलेज जॉईन केलं. फर्स्ट इयरला प्रा. अनंत काणेकर, डॉ. स.गं. मालशे शिकवत काणेकरांचं 'शिंपले आणि मोती' अभ्यासाला होतं. बालकवींच्या कविता होत्या. इंटरला माझे थोरले बंधू, प्रा. रमेश तेंडुलकर, प्रा. काणेकर होते. या सर्वांच्या प्रभावामुळे मी बी.ए.ला मराठी व संस्कृत विषय निवडले. फर्स्ट इअरचं संस्कृतचं रघुवंश अभ्यासाला होतं. इंटरला शंकराचार्यांचा वेदान्त उपनिषदे परिचित झाली. बी.ए. ला संस्कृत, नाटके, भगवद्गीता, अलंकारशास्त्र अभ्यासले. गीता माझा जिव्हाळ्याचा विषय आणि त्यात मला भरपूर मार्क मिळाले. मृच्छकटिकातला मुग्ध शृंगार अनुभवला.

इंग्रजीत Tempest, King Lear ही शेक्सपिअरची नाटके अभ्यासिली. रॉबर्ट ब्राउनिंगच्या कविता वाचल्या. रस्किन इंटरलाच होता. हौस म्हणून Golden Treasury वाचली. त्या वर्डस्वर्थ, शेली इत्यादी Lake Poet चा परिचय झाला. मराठीत जुने नवे बरेच साहित्य होते.

कॉलेजात असताना एक गोष्ट लक्षात आली की सिद्धार्थ कॉलेजची लायब्ररी संपन्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं ग्रंथप्रेम व शां.शं.रेगे सारखे ग्रंथपाल होते ते born ग्रंथपाल होते. कुठलं पुस्तकं कुठल्या कपाटात आहे ते सांगत. कुठलंही दुर्मिळ पुस्तक ते आणून देत. सिद्धार्थ कॉलेजच्या ग्रंथालयाचा लाभ प्रा.ना.सी.फडके, प्रा. वा.ल.कुलकर्णी यासारख्या थोर साहित्यिकांनीही घेतला.

मी एम्.ए.ला मराठी व संस्कृत हेच विषय घेतले. भवभूतीची नाटके अभ्यासताना मला सिद्धार्थ कॉलेजमधली पुस्तके मिळाली. त्यावर कॉलेजचे पहिले प्राचार्य

अश्वत्थामा बाळाचार्य गजेंद्रगडकर यांनी काळ्याभोर शाईत सुंदर अक्षरात टिपणे लिहिली होती. ती मला उपकारक ठरली. डॉ. कोलते यांनी महानुभावी पंथावर लिहिलेले पुस्तक डॉ. आंबेडकरांना भेट दिले होते.

एम्.ए. ला आम्हाला निरनिराळ्या महाविद्यालयात सकाळ संध्याकाळ जावे लागे. त्यामुळे अनेक थोर प्राध्यापकांचा लाभ झाला. एलफिन्स्टनमध्ये प्रा. म.वा.धोंड, नॅशनलला प्रा. वसंत बापट, वसंत दावतर, रुइयामध्ये डॉ.मो.दि.पराडकर, रूपारेलला प्रा.ल.ग. जोग, डॉ. गंगाधर नेर्लेकर, विल्सनमध्ये प्रा.वा.ल.कुलकर्णी, प्रा.एस.एन.गजेंद्रगडकर, रुइयात प्रा. शंकर वैद्य, डॉ.रा.शं. वाळिंबे इत्यादी अनेक प्राध्यापकांचे संस्कार माझ्यावर घडले ग्रंथालयांचा लाभ घडला. प्रा. धोंड भाषाशास्त्र शिकवत. प्रा. बापट ज्ञानेश्वरी व लावण्या शिकवत. प्रा. वैद्य तुकाराम शिकवत. डॉ. वाळिंबे, प्रा. वा.ल. Tragedy form शिकवत. साहित्यसमीक्षा शिकवत. एकच प्याला इत्यादी नाटके अभ्यासली. प्रा. अनंत काणेकर निबंध शिकवत. भवन्सचे प्रा.दळवी भाषांतर घेत.



महानगरपालिकेची नोकरी सोडून शाळेत शिक्षक झालो. तेथे इंग्रजी, मराठी, संस्कृत, समाजशास्त्र शिकवत असे. शाहीर पांडुरंग खाडिलकरांचा सहवास लाभला. एकीकडे मी पीच्.डी.चा अभ्यास करत असे. रुइया कॉलेजमधील डॉ.रा.शं.वाळिंबे माझे मार्गदर्शक होते. Lyris in Marathi 1885 to 1935 हा विषय होता.

रुईया कॉलेजच्या ग्रंथालयाचा लाभ मिळाला. सकाळी शाळेत शिकवत असे. दुपारी पाच-सहा तास रुईयाच्या ग्रंथालयात पीच.डी.चा अभ्यास करत असे. ग्रंथालय हवेशीर, उत्साहवर्धक होतं. सतीश दुभाषीसारख्या अभिनेत्याचा शाळेत सहशिक्षिक व रुइयातील विद्यार्थी म्हणून सहवास घडला. मोकळ्या स्वभावाचा असा तो मित्र होता. ते गणित, सायन्स शिकवीत.

१९६२ ला मी मराठवाड्यातील बलभीम कॉलेजमध्ये मराठीचा प्राध्यापक म्हणून जॉईन झालो. मागासलेलं गाव असल्यामुळे ग्रंथालय तितकसं चांगलं नव्हतं. ते संपन्न करण्याचे कार्य मी केले.

१९६५ ला मुंबईला परतलो. भवन्सच्या हजारी मल सोमाणी कॉलेजात अर्धवेळ प्राध्यापक म्हणून रुजू झालो. उपप्राचार्य प्रा. दळवींचे मार्गदर्शन लाभले. प्रा.वि.द.संत हे सहकारी होते. मुंबईला आल्यामुळे विविध ग्रंथालयांचा लाभ मी घेऊ लागलो. ह.रा.महाजनी संपादक होते त्या लोकसत्तेत मी पुस्तक परीक्षणे करीत असे. त्यानिमित्ताने अनेक नवीन पुस्तके मी वाचली.

भवन्सच्या जोडीला विलेपार्ले येथील डहाणूकरमध्येही मी शिकवत असे. तेथील ग्रंथालय संपन्न होते. Extra Curricular activities माझ्यावर लादल्या. प्रा.ल.ग.जोग यांनी मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन केले. मंगेश पाडगावकरांची 'जिप्सी' अभ्यासाला होती. त्यामुळे त्यांचे कवितावाचन घडवून आणले. व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी', देवलांचं 'संशयकल्लोळ' शिकविले.

मध्यंतरीच्या काळात पीच.डी.होऊ शकली नाही. बीडहून मुंबईला आल्यानंतर पीच्.डी.चा विचार डोकावला. मुंबई विद्यापीठाचे प्रपाठक डॉ.व.दि.कुलकर्णी यांना मार्गदर्शक निवडले. 'दासबोध : वाङ्मयीन समीक्षा' विषय घेतात. दोन वर्षे दासबोधमय झालो. बहुतेक पुस्तके

सिद्धार्थ कॉलेजमध्येच मिळाली. सुमनहार सारखी दुर्मिळ नियतकालिके वाचली. नायगाव येथील ग्रंथसंग्रहालयात जाऊन Bibliography तयार केली. अल्पावधीत मला पी.एच.डी. मिळाली.

शिक्षणाचे उच्च शिखर गाठले. सर्वांकडून कौतुक झालं. अभ्यासाकडे, जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी लाभली. त्यानंतरचं माझं वाचन शिस्तबद्ध, शास्त्रबद्ध पद्धतीनं झालं. कालावधीनंतर मी सिद्धार्थमध्ये मराठी विभाग प्रमुख झालो. त्यामुळे ग्रंथालयासाठी नवीन नवीन चांगली पुस्तके मी निवडली. Books are never failing friends याचा प्रत्यय आला. विविध भाषांमध्ये चौफेर वाचन केले. Siddhe नावाचं रिसर्च जर्नल निघायचे. त्याचे संपादक होते माझे गुरु, नंतरचे सहाध्यायी प्रा. शिवपुरी. मराठी वाङ्मयावर इंग्रजी लेख ते माझ्याकडून लिहून घेत. वर्षभर माझ्याशी चर्चा करत. तेच लेख नंतर मी Memorable Masters या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. त्याला सुप्रसिद्ध समीक्षक प्रा. म.वि. राजाध्यक्षांची प्रस्तावना लाभली. पी.एच.डी.चा विषयही 'दासबोध : वाङ्मयीन समीक्षा' पुस्तकरुपाने आला. त्याला उत्तम पुस्तक म्हणून पुण्याच्या एका संस्थेने गौरव केला.

बरीच वर्षे प्राध्यापकी केल्यानंतर १९९६ ला प्रपाठक Reader व मराठी विभागप्रमुख म्हणून निवृत्त झालो.

या काळात आपल्या हवे ते अन् हवे तेवढे वाचन व लेखन करता येऊ लागते. 'वसंत' मासिकात, वैचारिक, समीक्षात्मक लेख लिहिले. 'सिद्धगिरी संदेश' या आध्यात्मिक त्रैमासिकाचा मी गेली ३४ वर्षे संपादक आहे. त्यानिमित्ताने माझ्याकडून आध्यात्मिक लेखन बरेच घडते.

माझा शैक्षणिक प्रवास असा घडला. त्यात चढ उतार आले, संघर्ष झाले, परंतु अव्याहत प्रवास घडला. त्या यशात ग्रंथालयाचा वाटा मोठा आहे. सध्या रामायण, महाभारतासारखी संस्कृत महाकाव्ये मी वाचत आहे. संस्कृतमध्ये ज्ञानाचा सागर आहे. इंग्रजीही समृद्ध भाषा आहे. पं. जवाहरलाल नेहरुंचे Discovery of India सारखे पुस्तक मला रुचले. मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात अनेक इंग्रजी पुस्तके मी वाचली.

विद्येला अंत नसतो. माणूस शेवटपर्यंत विद्यार्थीच राहतो. त्याने विद्यार्थीच राहिले पाहिजे. प्रत्येक दिवशी काही ना काही ग्रंथांपासून शिकायला मिळते. तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे नित्य दिन येतो आनंदाचा. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी अवस्था होते. ब्रह्मानंद सहोदर' असा आनंद साहित्यापासून मिळतो. शास्त्रीय पुस्तक वाचल्यामुळे ज्ञानात भर पडते. Arts व Science व Commerce या केवळ सोयीसाठी शाखा पाडल्या आहेत. त्या तीनही शाखांतून आपल्याला शिकण्यासारखे काही आहे. सध्याच्या काळता विद्येच्या अनेक शाखा निघत आहेत. केवळ डॉक्टर वा इंजिनिअर न होता माणूस C.A. होतो. Business Management चा कोर्स करून उच्च पदावर जाऊ शकतो.

सारांश शिक्षण व ग्रंथालय याचा अनन्यसाधारण संबंध आहे.

डॉ. उमेश तेंडुलकर

८/६ लिलियानगर, स्वामी विवेकानंद रोड,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० ०६२.

दिशा
नियमित वाचा

# साहित्य जगत

## संग्राह्य पुस्तक
## 'शिक्षण संपल नाही अजून !'

-सुप्रसिद्ध लेखक श्री. बाळ सामंत यांचे 'शिक्षण संपलं नाही अजून' हे सुंदर पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. पुस्तकाची पृष्ठे ७१ असून मूल्य रु. ६०/- आहे. श्री. आप्पा परचुरे यांच्या परचुरे प्रकाशन मंदिराने (गिरगाव, मुंबई - ४०० ००४) ने प्रकाशित केलेले आहे.

काही वर्षांपूर्वी 'नवनीत' या डायजेस्टमधून श्री. सामंत यांनी 'ग्रंथायन' ही लेखमाला क्रमश: प्रसिद्ध केली होती. आनंदवन प्रकाशन संस्थेने ती पुस्तकरुपने प्रसिद्ध केली होती. आता पुरचुरे प्रकाशनाने ते पुस्तक पुनर्मुद्रित केलेले आहे. श्री. सामंत यांचे वाचन अफाट आहे. शेकडो इंग्रजी-मराठी नवी जुनी पुस्तके वाचून वाचकांना त्यांनी 'शापित यक्ष', 'मरणात खरोखर जग जगते' अशी कितीतरी उत्तम पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. नाट्यसंगीत हा सुद्धा त्यांच्या आवडीचा विषय आहे. त्यावरही त्यांनी पुस्तके लिहिलेली आहेत. प्रस्तुतचे 'शिक्षण संपलं नाही अजून !' हे पुस्तकही त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष पटविणारे आहे.

जगातले बहुतेक सर्व शास्त्रज्ञ साहित्यिक, राजकारणी, मोठमोठे विचारवंत व तत्ववेत्ते, विविध विषयांतील ख्यातनाम जाणकार मंडळी यांना पुस्तक वाचनाचे मोठे वेड असल्याचे आढळून आले आहे. इंग्लंडचे पंतप्रधान ग्लॅडस्टन हे आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत म्हणजे वयाच्या नव्वदाव्या वर्षापर्यंत रोज नवे नवे ज्ञान संपादण्यासाठी धडपड करीत असत. बेंजामिन फ्रँकलिन हे धड कॉलेजमध्येही गेले नव्हते. पण त्यांनी आयुष्यातला प्रत्येक क्षण वाचनात घालविला. केवळ वाचनाच्या या छंदामुळेच एक सर्वश्रेष्ठ अमेरिकन मुत्सद्दी अशी त्यांची ख्याती झाली. आपल्याकडे रविन्द्रनाथ टागोर, टिळक-आगरकर, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, विनोबा भावे, आचार्य अत्रे, राजवाडे इ. इ. महनीय मंडळींनी अपार वाचन करून भावी पिढीसाठी जी ग्रंथनिर्मिती केली त्याला तोड नाही. ग्रंथ म्हणजे नानाविध चिजांनी भरलेला खजिनाच. ग्रंथ हा माणसाला मिळालेला मानवजातीचा एक अमोल वारसा आहे आणि तो नुसता जतन करण्यातच नव्हे तर त्याचा वारसा या पिढीकडून दुसऱ्या पिढीला देण्यात मानवजातीचे कल्याण आहे.

एकंदरीत पुस्तकाचे महत्त्व सांगणारे हे उत्कृष्ट पुस्तक प्रत्येकाने वाचावे. लेखक श्री. सामंत व प्रकाशक परचुरे यांचे अभिनंदन.

## साहित्यिक प्रवीण दवणे यांच्या १३ पुस्तकांचे प्रकाशन

"साहित्य मनाला खरा आनंद देत. साहित्यामुळे मनावर संस्कार होतात. परंतु आजच्या स्पर्धात्मक युगात मराठी माध्यमातून शिक्षण घेणे कमी झाल्याने मराठी साहित्याची उतरण होत आहे त्यामुळे पुढील काळात मराठी साहित्याचे काय होणार, याची चिंता आपल्याला वाटते' असे उद्गार ज्येष्ठ साहित्यिक श्री. गंगाधर गाडगीळ यांनी येथे व्यक्त केले.

येथील श्री प्रतिष्ठान आयोजित ग्रंथसखा वाचनालय व बोरिवली (मुं. ९२) च्या नवचैतन्य प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील काटदरे मंगल कार्यालयात कवी, गीतकार, कथा-कादंबरीकार प्रवीण दवणे यांच्या १३ पुस्तकांच्या प्रकाशनसमारंभ पार पडला.

आपल्या भाषणात श्री. गाडगीळ पुढे म्हणाले, "पुस्तके लिहिणे कठीण नाही. पण चांगली पुस्तके लिहिणे कठीण आहे. प्रथमपासूनच साहित्यावर प्रेम केल्याने अजूनही लिहावेसे वाटते. पूर्वी कारखानदारी, शेती व्यापक प्रमाणात नव्हती, त्यामुळे साहित्यावर प्रेम करणारी मंडळी होती. आता मात्र परिस्थिती उलटी झाली असून साहित्य लोप पावल्याचे दिसून येते. हे संस्कृतीच्या दृष्टीने हानीकारक

आहे."

प्रवीण दवणे आपल्या मनोगतात म्हणाले, "गेल्या ३५ वर्षांच्या साहित्याच्या सहवासात स्वत:च्या मनापासून प्रेम केले. गंगाधर गाडगीळ यांच्या लेखनातून मला प्रेरणा मिळाली. त्यांच्या कथातून संस्कार मिळाले. तसेच बा.भ.बोरकर, कुसुमाग्रज, वि.स.खांडेकर, शांता शेळके, पु.भा.भावे, ग.दि.माडगूळकर इ. श्रेष्ठ साहित्यिकांचाही आपल्यावर पगडा होता."

या समारंभात दवणे यांच्या प्रकाशित झालेल्या पुस्तकांपैकी 'जेथे जातो तेथे' व 'फुलण्यात मौज आहे' ही पुस्तके नवीन आहेत. तर 'सावर रे' (भाग १ ते ४) 'घडणाऱ्या मुलांसाठी', 'वय वादळ विजांचं' 'रंग मेघ' (कविता) 'दिलखुलास', 'माझिया मना', 'तिचं आकाश', 'अलगुज', 'मोठे लोक छोटे होते तेव्हा', 'पाऊस पहिला', व 'ध्यानस्थ' या पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या आहेत.

श्री. दवणे (ब-३०३, 'राजहंस', लुर्सस वाडी, पारसिक बँकेसमोर, ठाणे (प.) - ४०० ६०४) यांच्या लेखनास २५ वर्षे पूर्ण झाले. त्यानिमित्त या कार्यक्रमात मकरंद जोशी यांनी दवणे यांची मुलाखत घेतली. 'माझ्या लेखनाची आनंद यात्रा' या कार्यक्रमात त्यांनी विविध साहित्य प्रकारातून केलेल्या लेखकाने अनुभव सांगितले. 'ग्रंथसखा' वाचनालयाचे शाम जोशी, श्री पतिष्ठानचे श्रीधर पाटील व नवचैतन्य प्रकाशनाचे शरद मराठे यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यात विशेष मेहनत घेतली.

नवचैतन्य प्रकाशनाने (सी-११, न्यू गजांत सोसायटी, तळमजला, कोसागो नगर, फ्लाय ओव्हरजवळ, एस.व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई - ४०० ०९२) आजवर श्री. दवणे यांची एकूण १८ पुस्तके प्रकाशित केली आहेत.

## सोपे मराठी शुद्धलेखन

लेखक - संपादक : अरुण फडके

श्री. अरुण फडके (६०२, चित्रकूट सोसा. डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे (प.) - ४०० ६०१. फोन : ०२२-२५४७ ४६२२) हे मराठी लेखन कोशकार म्हणून प्रसिद्ध आहेत. (या कोशाची दुसरी आवृत्तीही संपत आलेली आहे.)

मराठी शुद्धलेखनाच्या प्रसारासाठी त्यांचे अथक् प्रयत्न चालू आहेत. यासाठी त्यांनी दोन उपक्रम चालविले आहेत. 'मराठी शुद्धलेखनातील महत्त्वाच्या जागा' या विषयावर ते सुमारे दोन अडीच तासांचे व्याख्यान देतात. यात सुमारे साठ तक्त्यांच्या आधारे विशिष्ट शब्द विशिष्ट पद्धतीनेच लिहिणे का बरोबर व दुसऱ्या पद्धतीने लिहिणे का चूक, हे कारणे व उदाहरणे यासह समजावून सांगतात.

याखेरीज श्री. फडके मराठी शुद्धलेखनाचे अभ्यासवर्ग घेतात. यामध्ये आठ दिवस रोज दीड तास एवढ्या कालावधीत ते शुद्धलेखनचे प्रचलित नियम शिकवितात. हे दोन्ही उपक्रम सशुल्क आहेत. साहित्य संस्था, वाचनालये, प्राथमिक-माध्यमिक शाळा संचालकांनी त्यांच्या या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा.

### 'शुद्धलेखन तुमच्या खिशात'(खिसा आवृत्ती)

शुद्धलेखन हा आग्रह न राहता ती सवय झाली पाहिजे' असे श्री. फडके यांना वाटते त्यासाठी त्यांनी २००१ मध्ये उपरोक्त मराठी लेखन कोश, लिहिला व २००२ मध्ये 'मराठी शुद्धलेखन प्रदीप' हे उत्कृष्ट 'शुद्धलेखन तुमच्या खिशात' (खिसा आवृत्ती) हा छोटा पॉकिटसाईज कोश लिहिला (यात नित्योपयोगी सुमारे ९५०० शब्दांची शुद्धलेखन सूची आहे. पृ. १७६ व मूल्य रु. २५/- फक्त) नितीन प्रकाशन, १६४६, टिळक रस्ता, टिळक स्मारक मंदिराजवळ, पुणे - ४११०३० यांनी तो प्रकाशित केला आता दोन महिन्यापूर्वीच त्याची पाचवी आवृत्ती त्यांनी प्रकाशित केलेली आहे.)

'सोपे मराठी शुद्धलेखन' प्रकाशित आता श्री. अरुण फडके यांच्या अंकुर प्रकाशनाने (पहिल्या परिच्छेदात दिल्या प्रमाणेच) सोपे मराठी शुद्धलेखन ही पुस्तिका (पृ. ६४ मूल्य रु. २५/- फक्त) ६-१-०५ रोजी प्रकाशित केलेली

आहे. इयत्ता पहिली ते चौथीसाठी शुद्धलेखनाची ही पुस्तिका विशेष उपयोगी आहे. शुद्धलेखनाची सवय व्हायला हवी असेल तर ते बालवयापासूनच शिकविले पाहिजे. शिकविता येईल असे एखादे पुस्तक असणे आवश्यकच होते ते काम श्री. अरुण फडके यांनी उत्तमरीत्या केले आहे. प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी आणि पालकांनी हे पुस्तक जरुर वाचावे, संग्रही ठेवावे. श्री. अरुण फडके यांचे खास अभिनंदन.

## 'गीताई' आणि गीता प्रवचने

### गीताई

श्रेष्ठ संत विनोबा भावे लिखित 'गीताई' हा मराठी भाषेतील एक चमत्कार आहे. गीताई हा संस्कृत भगवद्गीतेचा प्रासादिक पद्यानुवाद तर आहेच. शिवाय ती गीतेवरील भाष्य देखील आहे. संस्कृत गीतेतील धर्म-विचार 'गीताई'ने सर्वजनसुलभ केली आहे.

'गीताई'ला विनोबांनी आपल्या जीवनातील सर्वात मोठी उपलब्धी मानले. त्यांनी म्हटले होते, 'बाबा (विनोबा) जाईल, गीताई राहील. विनोबाला विसरा, गीताईचा करता येईल तेवढा प्रचार करा.' गीताईचा मराठी भाषिकांत सर्वत्र प्रसार व्हावा अशी विनोबांची तळमळ होती. आजच्या काळासाठी 'गीताई' हा निर्दोष सर्वग्राह्य व्हावा असा धर्मग्रंथ आहे.

या 'गीताई'च्या जन्माला २००५ साली ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. आजवर त्यांच्या सुमारे २३९ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून लक्षावधी प्रती संपल्या आहेत. 'गीताई'चा इतर भाषांतूनही अनुवाद झालेला आहे. लहान आकारातील (३.५ x ५ इंच) 'गीताई'चे मूल्य रु. ५/- आहे. मोठ्या आकारातील (ठळक टाईप ५ x ७.५ इंच) 'गीताई'चे मूल्य रु. ८/- आहे. या शिवाय संस्कृत गीता व गीताई एकत्र छापली आहे. ('गीता-गीताई' त्यांचे मूल्य आहे रु. १५/-) या दोन्ही पुस्तकांबाबत विनोबा म्हणत, 'माझा विश्वास आहे की जग माझी अन्य सेवा किंवा कृती विसरले तरी 'गीताई आणि गीता प्रवचने' कधी विसरणार नाही आणि माझी ही कृती जगाची सेवा करीत राहील.'

### गीता प्रवचने

धुळे तुरुंगात १९३२ मध्ये विनोबांनी गीतेवर दिलेली ही प्रवचने साने गुरुजींसारख्या सत्पुरुषाने लिहून घेतली. गीतेवरील साहित्यातच नव्हे, तर जगातील आध्यात्मिक साहित्यात अद्वितीय स्थान असलेल्या या ग्रंथाने आजवर हजारो लोकांना जीवनाची दिशा दाखविली आहे. जीवनशुद्धीची प्रेरणा दिली आहे. या ग्रंथाच्या आतापर्यंत ३,४७,००० प्रतींची विक्री झाली आहे. (२००३ पर्यंत) दरवर्षी हा आकडा वाढतच आहे. बहुतेक सर्व भारतीय भाषांत व अनेक विदेशी भाषांतही (एकूण २३ भाषांत) याचे भाषांतर झाले असून एकूण २५ लाखांहून अधिक प्रती प्रकाशित झाल्या आहेत. (ऑक्टो. २००४ साली प्रसिद्ध झालेल्या मराठीतील ४० व्या आवृत्तीची पृष्ठे २५६ असून मूल्य अवघे रु. २५/- आहे.) इंग्रजीत हा ग्रंथ 'टॉक्स ऑन गीता' (पृ. २८०, मूल्य रु. ६०/-) या नावाने प्रसिद्ध झाला आहे. मराठी व इतर भाषांतील भाषांतराची पुस्तके परधाम प्रकाशनाने (पवनार, जि. वर्धा - ४४२१११, दूरध्वनी ०७१२-२८८०४०) प्रकाशित केली आहेत. (संस्कृतमध्येही ही गीता प्रवचने एव्हांना प्रसिद्ध झाली असावीत) "गीता प्रवचने ही माझ्या जीवनाची गाथा आहे आणि तोच माझा संदेश आहे." असे विनोबांनी सांगितले आहे. इतरही अनेक महत्त्वाची, उत्तम संस्कार करणारी पुस्तके परधाम प्रकाशनाने प्रकाशित केलेली आहे. जिज्ञासूंनी त्यांच्याशी अवश्य संपर्क साधावा.

- शरद जोशी

(ग्रंथप्रसारक)

डोंबिवली (प.)

# परिसर वार्ता

## गणित प्रदर्शन

डॉ. श्रीनिवास रामानुजन जयंती प्रीत्यर्थ बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील गणित मंडळ (सिद्धांत) तर्फे २० डिसेंबर २००४ रोजी गणित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.




Math Exihibition on 20th December 2004
B.N. Bandodkar College of Science, Thane

प्रदर्शनाचे उद्‌घाटन बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डा.सौ.एम.के. पेजावर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा.आर.एस्. पोद्दार (गणित विभाग प्रमुख), महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

गणित विषयावर आधारित गणिताची उपयुक्तता वेगवेगळ्या बारा गटात FYBSC, SYBSC, TYBSC च्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केली.

बारा गटापैकी एका गटातील विद्यार्थी नितीन कटके आणि संतोष साळुंखे यांना उत्कृष्ट प्रदर्शनाबद्दल पुस्तकाच्या स्वरूपात पारितोषिक देण्यात आले.

## वार्षिक पारितोषिक वितरण

"बांदोडकर महाविद्यालय आणि नाटक यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्या काळात बांदोडकरची एकांकिका व प्रथम क्रमांक हे समीकरण ठरलेले होते. दुसरा नंबर बांदोडकरला माहीत नव्हता." असे उद्‌गार प्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. प्रा. विजय जोशी यांनी विवेकानंद जयंतीच्या दिवशी (१२ जानेवारी) सायंकाळी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना काढले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व स्वागतगीताने झाली. डॉ. विजय जोशी यांचा परिचय सूत्रसंचालन करणाऱ्या डॉ.सौ. पूनम कुर्वे यांनी करून दिला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ. माधुरी पेजावर यांनी वार्षिक अहवाल सादर केला. यानंतर विभागवार अहवाल सादर करण्यात आले. डॉ. विजय जोशी यांच्या भारावून टाकणाऱ्या भाषणानंतर 'संयुजा' या महाविद्यालयाच्या वार्षिकाचे त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. महाविद्यालयाच्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांचा बहुमान आर्चित वैद्य तर विद्यार्थिनीचा बहुमान स्मृती अंकोलीकर हिला देण्यात आला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर हे होते. त्यांच्या अध्यक्षीय भाषणाने समारंभाचा समारोप झाल्यावर पारितोषिके वितरित करण्यात आली.

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या सभागृहात झालेल्या या समारंभास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## वार्षिक मानकरी

बा.ना.बांदोडकर महाविद्यालयाची तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कुमारी सृष्टी शिवानंद अंकोलेकर हिची स्थानिक वृत्तपत्र 'दै.जनादेश'तर्फे वर्ष २००४ साठी स्तंभलेखनाकरिता वार्षिक मानकरी म्हणून निवड केली आहे.

भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थिनी कुमारी सृष्टी शिवानंद अंकोलेकर दै.जनादेश या वृत्तपत्रासाठी सातत्याने 'तळातलं गाळातलं' ह्या सदरात लिखाण करत आहे.

सामाजिक-राजकीय, भावनिक तसेच वर्तमान घडामोडींच्या अनुषंगाने या सदरात अनेक लेखक वर्तमान स्थितींवर मत प्रकट करीत असतात. त्यांच्या या मतांना वाचकांनी वारंवार प्रतिसाद दिला आहे.

या सदराव्यतिरिक्त कुमारी सृष्टी शिवानंद अंकोलेकर याच दैनिकात 'पडसाद' हे चालू घडामोडींवरील सदर लेखन करत आहे.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल स्नेहसंमेलन, आनंद मेला आणि क्रीडादिन

वर्षभर विद्यार्थी व शिक्षक ज्याची आतुरतेने वाट बघत असतात तो शाळेचा वार्षिकोत्सव. हा आनंदोत्सव ह्यावर्षी १७, १८ आणि १९ डिसेंबर २००४ ला संपन्न झाला. १७ डिसेंबरला इ. ५ वी, ६वी चे स्नेहसंमेलन होते. त्यासाठी ठाणे कॉलेजचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य श्री. नायक सर हे प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली गेली. नायक सरांनी आपल्या भाषणात पालकांची जबाबदारी काय असावी ते सांगितले. ह्याआधी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली आणि अहवाल वाचन केले. इ. ५ वी, ६वीच्या छोट्या छोट्या मुलांनी अतिशय सुंदर कार्यक्रम सादर केले. त्यातील हिंदी आणि इंग्रजी एकांकिकेची अंतिम दिवसासाठी निवड करण्यात आली.

१८ डिसेंबर २००४ हा इ. ७वी, ८ वीचा दिवस होता. त्यासाठी दूरदर्शन निवेदिका स्नेहा आघारकर ह्या प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांनी आपल्या भाषणात अभ्यासाबरोबरच मुलांनी इतर कलांमध्ये ही रस घेतला पाहिजे असे सांगितले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली गेली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातून तामीळ नृत्य व पहाडी नृत्याची अंतिम दिवसासाठी निवड झाली. तिसऱ्या दिवशी म्हणजेच १९ डिसेंबरला इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम सादर केले गेले. त्यादिवशी युनिसेफच्या माजी संचालिका विजयाताई चौहान या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. सध्या त्या नर्मदा बचाव आंदोलन व या सारख्या सामाजिक कार्यात कार्यरत आहेत. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले ''आपल्या प्रगतीसाठी स्वत:शीच स्पर्धा करा, सहनशीलता वाढवा, दुसऱ्याच्या मताला किंमत द्या, मानवाची सेवा म्हणजे ईश्वराची सेवा, प्रत्येकाने आपल्या परीने समाजाचे ऋण फेडले पाहिजे.' अशा तऱ्हेने अनेक चांगल्या आणि अर्थपूर्ण विचारांनी परिपूर्ण असे त्यांचे भाषण होते. विजयाताईंच्या हस्ते अनेक पारितोषिके दिली गेली. त्यातील महत्त्वाची काही -

**प्रतिष्ठेचे समजले जाणारे आनंदीबाई जोशी पदक**

इ. ५ वी ते ६ वीच्या गटासाठी - ऋचा गणपुले आणि
इ. ८ वी व ९ वी गटासाठी - सोनिया कारापूरकर

इ. ५ वी ते ७ वी साठी

आदर्श विद्यार्थी - आदित्य रानडे
आदर्श विद्यार्थिनी - तन्मयी चिपळूणकर

इ. ८ वी ते १० वी साठी -
आदर्श विद्यार्थी - अमेय भट
आदर्श विद्यार्थिनी - प्राची जोशी

**अल्पोपहार -**

२० डिसेंबर रोजी इ. ५ वी ते इ. १०वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना स्वादिष्ट वडा पाव व गुलाबजाम असा अल्पोपहार देण्यात आला.

**आनंद मेळा -**

२१ डिसेंबर रोजी शाळेच्या आवारातच आनंदमेळा आयोजित केला होता. वेगवेगळे खाद्यपदार्थ व खेळ यांची रेलचेल होती.

त्याच दिवशी सरस्वती शाळेच्या शिक्षिका सौ. राजेबाई यांनी गणित प्रयोगशाळेचे तर महाराष्ट्र टाईम्सचे वार्ताहर श्री. रविंद्र मांजरेकर यांनी भूगोल प्रयोगशाळेचे उद्‌घाटन केले. कठीण वाटणाऱ्या या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना रूची वाटावी, मुलभूत ज्ञान त्यांना प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे प्राप्त व्हावे ह्यासाठी अशा प्रयोगशाळा आवश्यकच आहेत. उद्‌घाटनासाठी आलेले पाहुणे ही ह्या प्रयोगशाळा बघून अत्यंत प्रभावित झाले.

**क्रीडादिन**

इ. ५ वी ते इ. ७ वी - २२ डिसेंबर आणि इ. ८ वी ते ९ वी साठी २००४ रोजी क्रीडादिन मावळी मित्र मंडळ येथे होता. विविध प्रकारच्या वैयक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये मुलांनी आपले नैपुण्य दाखविले.

## जल व्यवस्थापन २०२५

नद्या जोड योजनेत राजकारणी, अधिकारी आणि व्यापारी या तिघांनी मिळून प्रचंड गैरव्यवहार केला असून या योजनेमुळे पाण्याची गरज तर पूर्ण होणारच नाही शिवाय या पाण्यावरून देशात लढाया सुरू होतील, असे भाकित 'मॅगसेसे' पुरस्कार विजेते राजेंद्र सिंह यांनी २१ जानेवारी रोजी ठाण्यात झालेल्या 'जलव्यवस्थापन २०२५' या परिसंवादात केले.




गेली तीन वर्षे आपण जलसाक्षरतेसाठी भारतभर फिरतो आहोत. १४४ नदीखोऱ्यांमध्ये जाऊन, पदयात्रा करून आल्यावर देशाच्या कानाकोपऱ्यांत प्रत्येक समाजाने पाण्याचे व्यवस्थापन करण्याचा स्वत:चा विशेष प्रयत्न केलेला आहे. त्यातील बहुतांश प्रयोग यशस्वी झाले आहेत. पण हे यशस्वी झालेले प्रयोग सर्वदूर पोहोचू शकले नाहीत. कारण पाण्याचे केंद्रीकरण करण्याचा घाट सरकारने सातत्याने घातला. आताही नदी जोड योजना म्हणजे पाण्याचे खाजगीकरण करण्याचा वेगळा मार्ग असल्याचा आरोपही सिंह यांनी को.

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कॉलेजतर्फे आयोजित परिसंवादाचे उद्‌घाटन खासदार प्रकाश परांजपे यांच्या हस्ते झाले. पाण्याची उपलब्धता आणि ते नसल्यामुळे निर्माण होणारे प्रश्न यांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशाप्रकारच्या चर्चा परिसंवादाची आवश्यकता आहे. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती असल्याचे एकदा ठासून सांगितले पाहिजे, असेही ते म्हणाले. तर बीजभाषण करताना खासदार सुरेश प्रभू यांनी भारतातील सध्याच्या पाणी स्थितीचा आढावा घेत, नद्या जोड योजनेची आवश्यकता स्पष्ट केली. जगात उपलब्ध असणाऱ्या पाण्यापैकी चार टक्के पाणी भारतात आहे. लोकसंख्या ज्या गतीने वाढते आहे त्या गतीने हे पाणी आपल्याला पुरेल का, असा प्रश्न आहे. त्यासाठी पुन्हा

जंगलाच्छिद जमीन वाढवली पाहिजे, असे प्रभू म्हणाले. लोकसंख्या, पाणी आणि जंगल या त्रिमितीच्या आधारावर पाणी धोरण ठरवूनच पाण्याचा प्रश्न सोडवावा लागेल, असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर स्वत:च्या जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून राबवल्या जात असलेल्या प्रयोगाची माहितीही त्यांनी दिली. मोठ्या धरणापेक्षा जुन्या नद्यांची पात्रे पुनरुज्जीवन करणे आणि पाण्याचे पारंपारिक स्रोत शोधणे या दोन पर्यायांचाही त्यांनी उच्चार केला.

अर्थशास्त्राचे तज्ज्ञ आणि नियोजन मंडळाचे माजी सदस्य प्रा. एच.एम.देसरडा यांनी पाण्याचे संकट अस्मानी नसून सुलतानी असल्याचे स्पष्ट केले. विकास कशाला म्हणायचे, वाढ, वृद्धी म्हणजे विकास का, याचा विचार करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. पाण्याची साक्षरता ज्यांना जास्त कळते त्या आदिवासींना आज पाण्यासाठी संकटात टाकण्यात आले आहे.

आमच्या देशात जलसंसाधनाची कमतरता नसून, संसाधनांची निरक्षरता आहे. पृथ्वी सगळ्यांना लागणारे किमान पाणी देत असते. त्याचा वापर नेमकेपणाने व्हायला हवा, असेही ते म्हणाले. देशातील चाळीस टक्के धरणे ज्या महाराष्ट्रात आहेत त्या राज्यात खेड्यांतील माणसांना प्यायला पाणी नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आता जलसाक्षरता, सामाजिक न्याय आणि चिरस्थायी विकास या त्रिसूत्रीचे महत्त्व लक्षात घ्यायला पाहिजे, असे देसरडा म्हणाले.

परिसंवादात डॉ. विजय बेडकर, प्राचार्य स.बा.गोखले, डॉ. एस.ए.सिंग, डॉ.के.के. खातू, डॉ. व्ही.एस.फडके आदींची भाषणे झाली.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल

१७/१/२००५

इ. ९ वीतील विद्यार्थी विविक्तेश आगवण आणि श्री. पटवर्धन हे 'जिज्ञासा' ठाणे आणि 'कुतुहल' अकोला यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत विजयी झाले. ही स्पर्धा १६ जानेवारी २००५ रोजी नेहरू सायन्स सेंटर येथे झाली. विभागीय स्तरावर १४ जानेवारी २००५ रोजी विजयी झाल्यावर १६ जानेवारीला त्यांनी ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले.

'सुर-वाणी-ज्ञान-मंदिर, ठाणे' या संस्कृत पाठशाळेने आयोजित केलेल्या आंतरशालेय संस्कृत श्लोक पठण स्पर्धेत कु. मनिष काळे (इ. ७वी) याने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

## विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या 'पॉलिझीन'चे प्रकाशन

दि. २५ जानेवारी रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या सेमिनार हॉलमध्ये तंत्रनिकेतनाचे 'पॉलिझीन' या वार्षिकाचे प्रकाशन संपन्न झाले.

दीपप्रज्ज्वलनाने कार्यक्रमात आरंभ झाला. त्यानंतर विद्यार्थिनींनी श्री. लुकतुके यांच्या मार्गदर्शनाखाली ईशस्तवन सादर केले. प्रमुख पाहुणे श्री. एस.सी.आगरकर यांची ओळख कु. विश्वास शिंदे या विद्यार्थ्याने करून दिली.




वि.प्र.मंडळाचे अध्यक्ष श्री. एस.व्ही. करंदीकर, पाहुणे श्री. एस.सी. आगरकर, दूरदर्शन कलावंत कु. अदिती सारंगधर व श्री. लोकेश गुप्ते वार्षिकाचे प्रकाशन करताना.

कु. वैभव गायकवाड या विद्यार्थ्याने सूत्रसंचालन व पाहुण्यांची ओळख नेटकेपणाने करून दिली. यानंतर कु. आदिती सारंगधर दूरदर्शन मालिका कलावंत यांच्या हस्ते 'पॉलिझीन' या वार्षिकाचे प्रकाशन झाले. शैक्षणिक पारितोषिके श्री. एस्.सी. आगरकर, टाटा इन्स्टिट्युट फंडामेंटल रिसर्चमधील प्राध्यापक यांच्या हस्ते देण्यात आली.

प्रमुख पाहुणे म्हणून श्री. एस.सी. आगरकर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले, कोणतीही गोष्ट सांगताना ठळकपणे आणि आत्मविश्वासाने सांगा. भारत देश गरीब आहे असे आपण सांगतो पण तसे नाही. ज्या देशाकडे सॅटेलाईट नेटवर्क असू शकते तो देश गरीब नाही. आपल्या देशाचा अभिमान ठेवा. आणि आपल्याकडे असलेल्या प्रत्येक गोष्टीचा अभिमान बाळगा. मार्केटिंग व्हॅल्यू वाढवा. श्री. एस्.सी. आगरकर यांचे भाषण खूपच माहितीपूर्ण होते.

यानंतर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. एस.व्ही. करंदीकर यांनी आपले भाषण सादर केले. दूरदर्शन मालिका कलावंत कु. अदिती सारंगधर आणि श्री. लोकेश गुप्ते यांनी आपल्या हार्दिक शुभेच्छा विद्यार्थ्यांना दिल्या. त्यांच्या हस्ते 'पॉलिझीन' समितीतर्फे घेतलेल्या स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. प्राचार्य श्री. दि.कृ. नायक यांनी वर्षभरातील तंत्रनिकेतनातील ठळक घडामोडींचा आढावा आपल्या भाषणात घेतला. यानंतर संपादिका सौ. अनिता पाध्ये यांनी आभारप्रदर्शनाचे भाषण केले.

**माहिती तंत्रज्ञानाबरोबर तांत्रिक शिक्षणाचा विकास - शोधनिबंध**

अमरावतीच्या गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सेमिनार आयोजित केला होता. हा सेमिनार 'इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन तर्फे महाराष्ट्र आणि गोवा विभागामधून 'रिव्हॅम्पिंग टेक्निकल एज्युकेशन टू मेक इट सिनेर्जीस्टिक विथ इनफर्मेशन रिव्होल्यूशन' या विषयावर दि. ४ व ५ फेब्रुवारी २००५ रोजी आयोजित केला होता.

या सेमनारमध्ये विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. दि. कृ. नायक आणि प्रा. श्री. मोहिते-पाटील यांनी त्यांचे शोधनिबंध सादर केले होते. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या समवेत तांत्रिक शिक्षणात सुधारणा, वाढ करणे हा उद्देश समोर ठेऊन हे शोधनिबंध सादर केले आहेत.

प्रा. मोहिते-पाटील यांच्या शोधनिबंधाचा गोषवारा

जागतिककरणाचा प्रभाव आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीचा तांत्रिक शिक्षणावर असलेला प्रभाव. या शोध निबंधात मुख्यत्वेकरून सध्याच्या अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनातील शिक्षणपद्धतीतील उणीवा, तंत्रज्ञानातील वेगवेगळे शोध व त्याचा उच्च शिक्षणावर पडणारा प्रभाव तसेच राष्ट्रीय धोरण, सध्याच्या शिक्षणपद्धतीतील आव्हाने व संधी यावर भर देण्यात आला. शैक्षणिक संस्थेसाठी काही बाबी आवश्यक आहेत. त्यांत आर्थिक तरतूद माहिती तंत्रज्ञानाचे युग असल्याने माहिती तंत्रज्ञान हा शैक्षणिक संस्थांचा एक महत्त्वाचा भाग आहे. या माहितीचा उपयोग जर शैक्षणिक पद्धतीत झाला तर ती शैक्षणिक पद्धत उत्तम ठरू शकते. टेक्नॉलॉजीही सतत बदलत असते. त्यामुळे अद्ययावत ठेवावी लागते. ज्ञान हे नेहमी द्यावे म्हणजे वाढू शकते. विविध संस्थांमध्ये ज्ञानाचा प्रसार करावा लागतो.



श्री. मोहिते पाटील

तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांच्या निबंधाचा गोषवारा -

'इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी तर्फे नोकऱ्यांच्या संस्था' हे या शोध निबंधाचे नाव आहे. पदविका धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना इंडस्ट्रीत काम करतानाही शिकता येते. इंजिनिअरिंगचे शिक्षण ही हळूहळू महाग होत चालले आहे. जागतिकीकरण, यांत्रिकीकरण यामुळे दैनंदिन तांत्रिक कौशल्याला मागणी कमी आहे. वैशिष्ट्यपूर्ण आणि विविध शाखांमध्ये जर कौशल्य प्राप्त केले तरच नोकरीसाठी संधी उपलब्ध होऊ शकते.


श्री. दि. कृ. नायक

ज्या संस्था तांत्रिक शिक्षण देतात त्यांच्यापुढे एक मोठे आव्हान आहे. भविष्यातील होणाऱ्या विविध बदलांमुळे पदविका धारण करणारांनाही इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे दार उघडे आहे.

आजच्या इंडस्ट्रित पदविका इंजिनिअर्सना जास्त मागणी आहे. कारण ते नवीन तांत्रिक शिक्षण शिकलेले असतात. त्यांना प्रात्यशिक्षकांचा जास्त अनुभव असतो. विशेष विषयांचे छोटे छोटे अभ्यासक्रम स्विकारून शिकल्यास ते इंडस्ट्रीतील गरजेप्रमाणे पात्र ठरतात.

इंजिनिअरचे काम हळूहळू खालील प्रमाणे बदलत गेले आहे. उदा. उत्तम सुपरव्हिजन, नेटवर्क, मॅनेजमेंट, क्वॉलिटी अशुरन्स आणि मॅनेजमेंट सॉफ्टवेअर, हार्डवेअर, मेंटनन्स् मॅनेजमेंट, सेफ्टी ऑफ प्लॅन्ट, ट्रेनींग पॉवर.

वरील दोन्ही शोधनिबंध हे माहिती तंत्रज्ञानाच्या युगात उपयुक्त ठरतील यांत शंकाच नाही. इंजिनिअरिंगचे शिक्षण-आव्हाने आणि संधी, जागतिकीकरणाचा प्रभाव आणि माहिती तंत्रज्ञानाचा तांत्रिक शिक्षणवर प्रभाव, माहिती युग आणि शिक्षकांचा सहभाग याचे प्रतिबिंब या शोधनिबंधातून दिसून येते.

- संकलित

१ एप्रिल १९५५ ! मराठी भाषेत महत्वाचा म्हणून नोंदला जाईल असा दिवस. या दिवशी 'आधुनिक वाल्मिकी' गदिमांच्या गीतरामायणातील पहिल्या गीताचे रेडिओवरून प्रसारण झाले. या घटनेला ५० वर्षे पूर्ण होतील!

या निमित्ताने मार्चच्या अंकात एक विशेष लेख येत आहे.

## दिशाला

लेखन सहाय्य करू इच्छिणारांना विनंती-

आंतरराष्ट्रीय पदार्थ विज्ञान वर्ष असल्याने या विषयावर अच्युतराव पटवर्धनांचे वर्ष जन्म शताब्दी वर्ष असल्याने त्यांच्या कार्य तत्त्वज्ञानावर व केशवसुत स्मृतिशताब्दी वर्ष असल्याने केशवसुतांच्या तत्त्वज्ञानावर लेख दिल्यास त्यांचा विचार केला जाईल।